# दैनिक हिंदू प्रकाशवार्ता

epaper.hinduprakashwarta.com | Web portal : hinduprakashwarta.com

PRGI No.: MHMAR/25/A2358

सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

छत्रपती संभाजीनगर ❀ गुरूवार, दि. १३ ऑगस्ट २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : ११४ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com


## राज्यात 60 'आदर्श दुय्यम निबंधक' कार्यालये उभारणार

**मुंबई :** राज्यातील दुय्यम निबंधक कार्यालयांचे आधुनिकीकरण करण्यासाठी राज्य सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. नोंदणी आणि मुद्रांक विभागांतर्गत 60 आदर्श दुय्यम निबंधक कार्यालये उभारण्यात येणार असून, त्यासाठी 60 नवीन पदांना शासनाने मंजुरी दिली आहे. पुण्यातील कोथरूड येथे या उपक्रमातील पहिले आदर्श कार्यालय सुरू करण्यात येणार आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते गुरुवारी, 13 ऑगस्ट रोजी या कार्यालयाचे उद्घाटन होणार आहे.

## इराणवर माझा अजिबात विश्वास नाही- ट्रम्प

**तेहरान :** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणबाबत मोठे वक्तव्य केले आहे. ट्रम्प यांनी म्हटले की, त्यांचा इराणवर अजिबात विश्वास नाही. ते म्हणाले, "इराणवर विश्वास ठेवणारा मी शेवटचा व्यक्ती असेन. त्यांनी माझ्याशी सातत्याने खोटे बोलले आहे." ट्रम्प यांनी दावा केला की, सध्या होर्मुझ सामुद्रधुनीवर अमेरिकेचे पूर्ण नियंत्रण आहे. ते म्हणाले, "त्यांचे (इराणचे) नियंत्रण नाही. आमचे पूर्ण नियंत्रण आहे. हा भाग आमच्या ताब्यात आहे." ट्रम्प यांनी पुढे इशारा देताना म्हटले की, इराणने कोणत्याही वेळी काही करण्याचा प्रयत्न केला, तर त्याला "उडवून दिले जाऊ शकते."

# अजिंठा लेणीत मृत्यूचा तांडव टळला पण वन विभाग MTDC आणि ASI गाढ झोपेत तिन्ही विभागांच्या भोंगळ कारभारामुळे पर्यटकांचे जीव रामभरोसे

हिंदू प्रकाशवार्ता / शेख हक्कानी

फर्दापूर रविवारी रात्री अजिंठा लेणीच्या शॉपिंग प्लाझामध्ये अस्वलाने घातलेला धुमाकूळ आणि सुरक्षारक्षकांनी जिवावर उदार होऊन साक्षात मृत्यूशी दिलेली झुंज हा केवळ एक थरार नव्हता तर हा वन विभाग MTDC आणि ASI या तिन्ही महाभागांच्या चेहऱ्यावरील निष्क्रियतेचा बुरखा टराटरा फाडणारा प्रसंग होता जागतिक वारसा स्थळाच्या नावावर फक्त मलाई खाणाऱ्या आणि जबाबदारी ढकलणाऱ्या या विभागांनी लेणी परिसराला अक्षरश मृत्यूचा सापळा' बनवून ठेवले आहे

**नेमके काय घडले थरारक घटनाक्रम**

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार अजिंठा लेणी परिसरात रविवारी रात्री एका हिंस्र अस्वलाने मनसोक्त वावर केला यावेळी येथे तैनात असलेले सुरक्षा रक्षक रतन देवकर राजू दामोदर आणि मिलिंद मगरे यांच्या अंगावर हे अस्वल अचानक धावून आले समोर साक्षात मृत्यू उभा असतानाही या जवानांनी घाबरून पळ काढला नाही तर जिवाची बाजी लावत एकत्र येऊन अस्वलाला हुसकावून लावले

**विभागानुसार ढिसाळ कारभाराचा पंचनामा**

**वन विभाग फक्त बाता कृती शून्य**

जंगलातील हिंस्र वन्यजीव थेट मानवी वावर असलेल्या शॉपिंग प्लाझात येऊन धुमाकूळ घालत आहेत तरी वन विभाग नेमका काय करत आहे बिबटे लांडगे आणि अस्वलांचा उघड वावर असतानाही वन विभागाने इथे पर्यटकांच्या आणि रक्षकांच्या सुरक्षेसाठी कोणतीही ठोस प्रतिबंधात्मक उपाययोजना किंवा कुंपण Fencing का उभारले



नाही एखाद्या निरपराध पर्यटकाचा किंवा रक्षकाचा बळी गेल्यानंतरच वन विभागाचे अधिकारी आपल्या एसी केबिनमधून बाहेर येणार का असा संतप्त सवाल विचारला जात आहे

**महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ वसुलीत वाघ सुरक्षेत शेळ्या**

अजिंठा लेणीत येणाऱ्या लाखो देशी विदेशी पर्यटकांकडून कोट्यवधी रुपयांचा महसूल गोळा करणाऱ्या MTDC ला स्वत च्या कर्मचाऱ्यांची शून्य काळजी आहे ज्या शॉपिंग प्लाझात ही काळजाचा ठोका चुकवणारी घटना घडली तिथे रात्रीच्या वेळी पुरेशी प्रकाशव्यवस्थाही नाही तुटपुंज्या पगारावर काम करणाऱ्या आणि जिवाची बाजी लावणाऱ्या या सुरक्षारक्षकांना हिंस्र प्राण्यांशी लढण्यासाठी आधुनिक उपकरणे तर दूर साध्या काठ्यांच्या भरवशावर मृत्यूच्या दाढेत ढकलण्यात आले आहे

**भारतीय पुरातत्व सर्वेक्षण वारसा स्थळाच्या सुरक्षेचा खेळखंडोबा**

मुख्य लेणी आणि परिसराची जबाबदारी असलेल्या ASI चा कारभार तर याहून भयंकर आहे. लेणीच्या 'सप्तकुंड' परिसरात अतिउत्साही पर्यटक जीवघेण्या वाघूर नदीत पोहण्यासाठी थेट जंगलाच्या मार्गाने घुसतात ज्यामुळे नुकताच रविवारी एका २१ वर्षीय तरुणाचा बुडून मृत्यू झाला प्रतिबंधित क्षेत्रांमध्ये जाण्यापासून पर्यटकांना रोखण्यासाठी ASI ची यंत्रणा पूर्णपणे कुचकामी ठरली आहे धोक्याचे फलक नाहीत सुरक्षारक्षकांची वानवा आहे आणि एकंदरच सुरक्षेचा पुरता बोजवारा उडाला आहे

**एकमेकांकडे बोट दाखवण्याचा निर्लज्ज खेळ**

अजिंठा लेणीसारख्या आंतरराष्ट्रीय पर्यटन स्थळावर या तीनही विभागांमध्ये अजिबात समन्वय नाही जेव्हा एखादी दुर्घटना घडते तेव्हा वन विभाग MTDC कडे MTDC ASI कडे आणि ASI वन विभागाकडे बोट दाखवून नामानिराळे होता

आज सुरक्षारक्षकांच्या अफाट धाडसामुळे अस्वलाचा हल्ला परतवून लावता आला पण उद्या जर याच अस्वलाने किंवा बिबट्याने एखाद्या पर्यटकाचा लचका तोडला तर त्याची जबाबदारी वन विभाग घेणार MTDC घेणार की ASI परदेशी पर्यटकांसमोर देशाची अब्रू वेशीवर टांगणाऱ्या या तीनही विभागांच्या झोपा आता तरी उघडणार का हाच सर्वात मोठा प्रश्न आहे

## थोडक्यात वार्ता

### चालत्या गाडीतून महिलेच्या गळ्यातून दागिन्याची चोरी

हिंदु प्रकाश वार्ता / अशोक पवार

**परभणी :** परभणीहून नांदेडकडे व रात्रीतून अनेक सुपरफास्ट एक्सप्रेस यांची ये जा चालूच असते कधी कधी सिंगल न मिळाल्यामुळे कमी स्पीड मध्ये दमाने चालवली जाते चोरट्यांना नेमके या संधीचा फायदा घेत खिडकीजवळ झोपलेल्या प्रवाशांना त्यांच्या जवळील दागिने हिसकावण्याचा प्रयत्न चोरटे करत असतात अजिंठा एक्सप्रेस ने प्रवास करत असलेल्या पुतळा हेमावती सत्यनारायण यांनी आपल्या तक्रारीत दिली आहे फिर्यादी हा अजून काय प्रवास करत असताना पिंगळे रेल्वे स्टेशन येण्याअगोदर सिग्नलवर गाडी थांबवली असताना महिला प्रवाशा च्या झोपेचा फायदा घेऊन अज्ञात स्वरूप यांनी गळ्यातील सोन्याची पोत सोन्याची वाटी तीन तोळे सोन्याची चैन असे एकूण साडेतीन लाख रुपयांचे दागिने घेऊन चालत्या गाडीतून पळ काढला या घटनेचे रेल्वे पोलिसात गुन्हा नोंदविण्यात आला असून रेल्वे पोलीस अधिक तपास करत आहेत रेल्वे प्रवासामध्ये परवाच्या जवळील मौल्यवान वस्तू दागिने मोबाईल चोरी जाण्याच्या बऱ्याच घटना दररोज घडत असून रेल्वे पोलिसांनी आपली गस्त वाढवावी सर्व रेल्वे प्रवाशातून होत आहे.

### परभणीत तरुणी बेपत्ता; शोध घेण्याचे आवाहन

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**परभणी:** परभणी शहरातील टिचर कॉलनी येथील शेख अरीबा समीम शेख अताउल्ला ही तरुणी दि. ३ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारपासून बेपत्ता झाली आहे. याप्रकरणी नानलपेठ पोलीस ठाण्यात मिसिंग क्रमांक ४७/२०२६ प्रमाणे नोंद करण्यात आली आहे. बेपत्ता तरुणी ही शिक्षित असून रंग गोरा आहे. डोळे काळे/पांढरे, केस काळे असून बांधा सडपातळ आहे. अंगात पंजाबी ड्रेस असून बदामी रंगाचा टॉप असल्याचे नमूद करण्यात आले आहे. ती हिंदी व मराठी भाषा बोलते. या तरुणीबाबत कोणास काही माहिती मिळाल्यास अथवा ती आढळून आल्यास तात्काळ नानलपेठ पोलीस ठाणे, परभणी यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### चीनचे माजी पंतप्रधान झू रोंगजी यांचे निधन



**बीजिंग :** चीनचे माजी पंतप्रधान झू रोंगजी यांचे वयाच्या ९८व्या वर्षी निधन झाले आहे. झू रोंगजी यांनीच चीनला जागतिक व्यापार संघटनेत (डब्ल्यूटीओ) सहभागी करून घेण्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती. तसेच चीनच्या आर्थिक विकासाला वेग देण्यातही त्यांचा मोठा वाटा होता. चीनच्या सरकारी वृत्तसंस्थाने दिलेल्या माहितीनुसार, झू रोंगजी यांचे बुधवारी सकाळी सुमारे ११ वाजता बीजिंगमध्ये आजारपणामुळे निधन झाले. त्यांनी वयाच्या ९८व्या वर्षी अखेरचा श्वास घेतला. चीनच्या सरकारी माध्यमांनुसार, १९९०च्या दशकात झू रोंगजी यांनी सरकारी उद्योगांमध्ये मोठ्या आणि कठीण स्वरूपाच्या सुधारणा केल्या. तसेच चीनला जागतिक व्यापार संघटनेत सहभागी करून घेण्यासाठी त्यांनी महत्त्वपूर्ण प्रयत्न केले. या निर्णयांमुळे चीनमध्ये अभूतपूर्व आर्थिक विकासाची सुरुवात झाली.झू रोंगजी यांना एकेकाळी इतर कम्युनिस्ट देशांमधील सुधारणांचे कौतुक केल्यामुळे ग्रामीण भागात निर्वासित करण्यात आले होते आणि शारीरिक श्रम करण्यास भाग पाडण्यात आले होते. मात्र, पुढे १९९८ ते २००३ या काळात चीनचे पंतप्रधान म्हणून त्यांनी अनेक मोठे आणि महत्त्वपूर्ण बदल घडवून आणले.

# छत्रपती संभाजीनगरात आरक्षणातील उपवर्गीकरणाविरोधात महामोर्चा

## 'जय भीम'च्या घोषणांनी क्रांती चौक दणाणला



हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** अनुसूचित जातींच्या आरक्षणातील प्रस्तावित उपवर्गीकरणाविरोधात आनंदराज आंबेडकर यांच्या नेतृत्वात छत्रपती संभाजीनगरमध्ये एक भव्य आणि ऐतिहासिक महामोर्चा काढण्यात आला. जालना आणि नांदेडनंतर आता छत्रपती संभाजीनगरातही याविरोधातील तीव्र संताप पाहायला मिळाला असून, 'जय भीम'च्या घोषणांनी क्रांती चौक पूर्णपणे दणाणून गेला होता.

या महामोर्च्यात अनुसूचित जातींमधील ५९ जातींचे हजारो नागरिक आणि बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. क्रांती चौकातून निघालेला हा महामोर्चा विभागीय आयुक्त कार्यालयाकडे रवाना झाला. दरम्यान, उपवर्गीकरणाला विरोध करण्यासाठी मोर्च्यात सहभागी झालेल्या जनतेशी संवाद साधत उपवर्गीकरण कधीही होऊ देणार नाही, अशी ठाम भूमिका मांडण्यात आली. हा महामोर्चा म्हणजे छत्रपती संभाजीनगरमधील राज्य सरकारला आणि बदर समितीला धडकी भरवणारा एक अभूतपूर्व आणि प्रचंड मोर्चा ठरला असून, 'आरक्षण बचाव, उपवर्गीकरण हटाव' आणि 'क्रांतीकारी जय भीम, आंबेडकरी एकजुटीचा विजय असो' अशा घोषणांनी परिसर दुमदुमला.

मोर्च्याच्या पार्श्वभूमीवर कायदा-सुव्यवस्था आणि वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी पोलिसांकडून मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. यामध्ये ३० पोलीस अधिकारी आणि ६०० हून अधिक पोलीस कर्मचारी चोख बंदोबस्तासाठी तैनात होते. उपवर्गीकरणाच्या मुद्द्यावरून आक्रमक झालेले आंदोलक म्हणाले की, सरकारने आमच्यामध्ये फूट पाडण्याचा जो घाट घातला आहे, त्या सरकारला स्मशानघाटात पोहोचवायला ५९ जाती तयार आहेत! या महामोर्च्यामुळे छत्रपती संभाजीनगर शहरात आंबेडकरी एकजुटीचे मोठे शक्तिप्रदर्शन पाहायला मिळाले.

### इमरान खान यांच्या मृत्यूचा दावा

**इस्लामाबाद :** पाकिस्तानातील ज्येष्ठ पत्रकार वजाहत एस. खान यांनी इमरान खान यांच्या मृत्यूचा दावा केला आहे. पाकिस्तानी सरकार आणि लष्करातील सूत्रांच्या हवाल्याने त्यांनी हा दावा केला.त्यानंतर पाकिस्तान तहरीक-ए-इन्साफ (पीटीआय) पक्षाने मंगळवारी म्हटले की, पक्षाचे संस्थापक इमरान खान यांच्या प्रकृतीबाबत सातत्याने समोर येत असलेल्या "चिंताजनक बातम्यांमुळे" संपूर्ण देशात अस्वस्थता आणि घबराट निर्माण झाली आहे. पक्षाने सरकारकडे इमरान खान यांची भेट घेण्याची परवानगी देण्याची मागणी केली आहे.



पीटीआयाच्या केंद्रीय मीडिया विभागाने 'एक्स'वर केलेल्या पोस्टमध्ये म्हटले आहे की, इमरान खान यांच्या प्रकृतीबाबत सातत्याने समोर येणाऱ्या "चिंताजनक बातम्यांमुळे" "संपूर्ण देशात तीव्र चिंता आणि अस्वस्थता" निर्माण झाली आहे. पीटीआय च्या निवेदनात म्हटले आहे की, "सरकारने हे लक्षात ठेवले पाहिजे की इमरान खान हे कोणतेही सामान्य राजकीय कार्यकर्ते नसून, लाखो पाकिस्तानी नागरिकांनी निवडलेले आणि लोकप्रिय राजकीय नेते आहेत. त्यांच्या प्रकृतीबाबत जनतेला विश्वासात घेणे ही सरकारची जबाबदारी आहे."

### महानगरपालिका कर्मचाऱ्यांनी केले भीक मागो आंदोलन

#### जीएसटी अनुदान फरकाची रक्कम देण्याची मागणी



हिंदू प्रकाश वार्ता / अशोक पवार

**परभणी:-** महापालिका कर्मचारी व सेवानिवृत्त कर्मचारी यांचे वेतन दीर्घ काळाने रखडल्याने दिनांक दहा ऑगस्ट सोमवारपासून काम बंद आंदोलन सुरू केले आहे दिनांक 12 ऑगस्ट बुधवार रोजी कर्मचाऱ्यांनी शनिवार बाजार येथून जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत मोर्चा काढत कर्मचाऱ्यांनी शासनाच्या विरोधात घोषणाबाजी केली आंदोलनात भीक मागून जमा झालेली रक्कम प्रशासनाला देत निषेध नोंदविला आहे

मनपा कर्मचाऱ्यांचे मागील पाच महिन्याचे वेतन व सेवानिवृत्ती धारकांचे यात महापालिकेला जीएसटी अनुदान फरकाची रक्कम मिळाली नाही महापालिका जीएसटीचे 72 कोटीचे अनुदान मिळाल्यास महापालिकेला आर्थिक प्रश्न निकाली निघण्यास मदत होईल मात्र हा प्रस्ताव शासन दरबारी प्रणित आहे वेतन नसल्याने कर्मचाऱ्यावर आर्थिक संकट ओढावले आहे . वेतन व जीएसटी अनुदान फरकाकडे लक्ष वेधण्यासाठी कर्मचाऱ्यांनी सोमवारपासून काम बंद आंदोलन सुरू केले असून कर्मचाऱ्यांनी भीक मागून आंदोलन केले या आंदोलनात संघटनेचे अध्यक्ष नातेरखान जुने ठाकूर विशाल उपाडे नजम खान के के भारसाकळे अभिजीत कुलकर्णी अनुसया जोगदंड विश्वनाथ गोवाडे खाजा मोईन खान अतीक अहमद शीला गायकवाड सीताबाई तांबे शोभाबाई सालगुडे नंदाबाई सोनवणे ज्योती मोरे सुनीता घोगरे रेखावटे संदीप पवार प्रकाश गायकवाड मोहन वाघमारे भागवत करणार यांच्यासह मनपा कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

### दिल्ली - पुणे विमानात तांत्रिक बिघाड; प्रवाशांच्या सतर्कतेमुळे मोठा अनर्थ टळला!

**नवी दिल्ली :** दिल्लीहून पुण्याकडे येणाऱ्या स्पाइसजेटच्या विमानात उड्डाणापूर्वी तांत्रिक बिघाड झाल्याची घटना समोर आली आहे. विमानात बसल्यानंतर अचानक तापमान वाढल्याने प्रवाशांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागले. काही प्रवाशांना श्वास घेण्यासही अडचण येत असल्याचा दावा करण्यात आला. परिस्थिती गंभीर असतानाही विमान धावपट्टीवर नेण्यात आल्याने प्रवाशांनी उड्डाणाला तीव्र विरोध केला. अखेर प्रवाशांच्या सतर्कतेमुळे विमानातील बिघाड लक्षात आला आणि सर्व प्रवाशांना विमानाबाहेर काढण्यात आले. त्यामुळे संभाव्य मोठा अनर्थ टळल्याचे सांगितले जात आहे. दिल्लीहून पुण्याला जाणाऱ्या या विमानात लहान मुलांपासून ते ज्येष्ठ नागरिकांपर्यंत अनेक प्रवासी होते. विमानात बसल्यानंतर अचानक तापमान वाढल्याने प्रवाशांना असह्य उकाड्याचा सामना करावा लागला. काही प्रवासी अक्षरशः घामाने भिजले होते, तर काहींना श्वास घेण्यास त्रास होत असल्याचे सांगण्यात आले.

### पोलिसांच्या दडपशाहीविरोधात झारखंड बंद

**रांची :** झारखंडमध्ये स्पर्धा परीक्षांमधील कथित अनियमिततेविरोधात निदर्शने करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेल्या पोलीस कारवाईचे तीव्र पडसाद संपूर्ण राज्यात उमटत आहेत. विद्यार्थ्यांवर झालेल्या कथित पोलीस दडपशाहीचा निषेध करत भारतीय जनता पक्षाने (भाजप) पुकारलेल्या राज्यव्यापी 'झारखंड बंद'मुळे जनजीवन विस्कळीत झाले. दुसरीकडे, झारखंडच्या विविध भागांत भाजपने रस्ते अडवून चक्का जाम केला असून, जुन्या विधानसभेजवळ निदर्शने करणाऱ्या अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या २०० हून अधिक कार्यकर्त्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

झारखंड लोकसेवा आयोग आणि झारखंड कर्मचारी निवड आयोगच्या परीक्षांमधील कथित अनियमितता, जेएसएससी- सीजीएल परीक्षा तातडीने रद्द करणे आणि संपूर्ण प्रकरणाची केंद्रीय अन्वेषण ब्युरोमार्फत निष्पक्ष चौकशी करणे, या प्रमुख मागण्यांसाठी विद्यार्थी आणि परीक्षार्थी गेल्या काही दिवसांपासून तीव्र आंदोलन करत आहेत. याच आंदोलनाचा भाग म्हणून सोमवारी विद्यार्थ्यांनी 'विधानसभा घेराव' मोर्चा काढला होता. मात्र, नवीन विधानसभेकडे मार्च काढत असलेल्या या विद्यार्थ्यांवर पोलिसांनी लाठीचार्ज आणि वॉटर कॅननचा (पाण्याचा मारा) वापर केला.

या हिंसक कारवाईमध्ये शेकडो विद्यार्थी जखमी झाल्याचा दावा विद्यार्थी संघटनांनी केला आहे. विद्यार्थ्यांवरील लाठीमार आणि पोलिसांच्या अतिरेकाचा तीव्र निषेध करत झारखंड भाजपचे प्रदेशाध्यक्ष आदित्य साहू यांनी हेमंत सोरेन सरकारवर गंभीर आरोप केले आहेत. आमच्या मुलांवर आणि विद्यार्थ्यांवर अन्याय आणि अत्याचार झाले आहेत. नोकऱ्यांची विक्री, पेपरफुटी आणि आमच्या मुलांच्या शरीरावर ज्या प्रकारे लाठ्या चालवण्यात आल्या, त्याविरोधात आणि विद्यार्थ्यांच्या समर्थनात आज भाजप कार्यकर्ते रस्त्यावर उतरून झारखंड बंद ठेवत आहेत," असे आदित्य साहू यांनी सांगितले.

## "शाल जोडे"






# मराठवाड्यासाठी स्वतंत्र रेल्वे मंडळाची मागणी; खासदार भुमरेंचे रेल्वेमंत्र्यांना स्मरणपत्र

## मराठवाड्याच्या रेल्वे विकासाला गती देण्यासाठी केंद्राकडे पुन्हा पाठपुरावा

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** मराठवाड्याच्या रेल्वे विकासाला गती देण्यासाठी मराठवाड्यासाठी स्वतंत्र रेल्वे मंडळ स्थापन करण्यात यावे, या मागणीसाठी खासदार संदिपान भुमरे यांनी पुन्हा केंद्र सरकारकडे पाठपुरावा सुरू केला आहे. दिल्लीतील रेल भवन येथे केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांना त्यांनी स्मरणपत्र देत स्वतंत्र रेल्वे मंडळाच्या मागणीवर तातडीने कार्यवाही करण्याची मागणी केली.

खासदार भुमरे यांनी ८ जुलै २०२६ रोजी रेल्वेमंत्र्यांकडे यासंदर्भात पत्र सादर केले होते. मात्र, या मागणीवर अद्याप अपेक्षित कार्यवाही न झाल्याने त्यांनी स्मरणपत्राद्वारे पुन्हा लक्ष वेधले आहे.

दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड येथे ६ जुलै रोजी झालेल्या वार्षिक आढावा बैठकीत मराठवाड्यातील रेल्वे विकासाशी संबंधित विविध प्रश्न आणि मागण्या खासदार संदिपान भुमरे यांच्यासह मराठवाड्यातील खासदारांनी मांडल्या होत्या. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या मागण्यांवर अपेक्षित वेगाने कार्यवाही होत नसल्याने स्वतंत्र रेल्वे विभागाची गरज असल्याचे भुमरे यांनी या बैठकीत अधोरेखित केले होते.

सध्या मराठवाडा दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड मंडळाच्या कार्यक्षेत्रात येतो. मराठवाड्याची भौगोलिक व्याप्ती, वाढती लोकसंख्या, औद्योगिक विकास, पर्यटनाच्या वाढत्या संधी आणि रेल्वे प्रवाशांच्या गरजा



लक्षात घेता स्वतंत्र रेल्वे मंडळ स्थापन करणे आवश्यक असल्याचे भुमरे यांनी म्हटले आहे.

स्वतंत्र रेल्वे मंडळामुळे स्थानिक पातळीवरील निर्णयप्रक्रिया अधिक गतिमान होऊन नवीन रेल्वे प्रकल्प, मार्गांचे दुहेरीकरण व विद्युतीकरण, स्थानकांचा विकास, प्रवासी सुविधा तसेच देखभाल-दुरुस्तीच्या कामांना वेग मिळू शकतो. छत्रपती संभाजीनगर, अजिंठा, वेरूळ, दौलताबाद, पैठण, औंढा नागनाथ आणि परळी वैजनाथ यांसारख्या ऐतिहासिक व धार्मिक पर्यटनस्थळांच्या रेल्वे जोडणीला याचा मोठा फायदा होईल, असेही त्यांनी नमूद केले.

**शेंद्रा-बिडकीनच्या विकासालाही चालना**

दिल्ली-मुंबई औद्योगिक कॉरिडॉरअंतर्गत शेंद्रा-बिडकीन औद्योगिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक होत आहे. या पार्श्वभूमीवर मालवाहतूक, रेल्वे साइडिंग, माल टर्मिनल, पिट लाईन आणि लॉजिस्टिक सुविधांचा विकास करण्यासाठी स्वतंत्र रेल्वे प्रशासकीय व्यवस्था उपयुक्त ठरेल, असे भुमरे यांनी स्मरणपत्रात म्हटले आहे.

स्वतंत्र रेल्वे मंडळ स्थापन करण्यासाठी सविस्तर व्यवहार्यता अहवाल (डीपीआर) तयार करून केंद्र सरकारच्या मंजुरीसाठी प्रस्ताव तातडीने सादर करावा, तसेच संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक निर्देश द्यावेत, अशी मागणी भुमरे यांनी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे केली आहे. स्वतंत्र रेल्वे मंडळाचा निर्णय झाल्यास मराठवाड्यातील रेल्वे विकासासोबतच उद्योग, पर्यटन, रोजगार आणि प्रादेशिक विकासालाही मोठी चालना मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



# सं पा द की य

## भारतीय तोफखान्याची स्वदेशी ताकद

रणांगणावर भारताच्या संरक्षण क्षमतेने गाठलेला ऐतिहासिक टप्पा हा देशाच्या लष्करी आत्मनिर्भरतेचा आणि तांत्रिक प्रगतीचा उत्तम पुरावा आहे. डीआरडीओ, भारत फोर्ज आणि टाटा यांच्या संयुक्त विद्यमाने विकसित केलेली 'एटीएजीएस' (ATAGS) ही स्वदेशी १५५ मिमी/५२ कॅलिबर तोफ आता भारतीय तोफखान्याची मुख्य ताकद बनली आहे. अफाट मारक क्षमता, अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि तब्बल ४८ किलोमीटरपर्यंत अचूक मारा करण्याची ताकद यामुळे ही 'मेड इन इंडिया' तोफ जगातील सर्वात शक्तिशाली तोफांच्या पंक्तीत जाऊन बसली आहे. अमेरिकेची एम७७७ किंवा चीनची एएच४ या तोफांच्या तुलनेत एटीएजीएस तोफ वजनाने भारी असली, तरी तिची मारक क्षमता आणि तांत्रिक वैशिष्ट्ये अत्यंत अद्वितीय आहेत. अवघ्या १५ सेकंदात ३ गोळ्यांचा वेगाने वर्षाव करण्याची तिची क्षमता शत्रूचा बंकर पूर्णपणे उद्ध्वस्त करू शकते. तसेच, स्वतःच्या सहाय्यक पॉवर युनिटमुळे (APU) कोणत्याही वाहनाशिवाय ताशी १८ किलोमीटर वेगाने खडबडीत भूभागावर स्वतःची जागा बदलण्याची तिची क्षमता लडाख आणि सिक्कीमसारख्या दुर्गम सीमांवर सैन्याला मोठे सामरिक बळ देणारी आहे. कधीकाळी शस्त्रास्त्रांच्या आयातीवर अवलंबून राहणाऱ्या भारताने आता स्वतःची प्रगत आणि जगज्जेती शस्त्रास्त्रे तयार करण्यास सुरुवात केली आहे. सुमारे ७ हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीतून ३०७ तोफा आणि वाहनांची लष्कराला होणारी पुरवठा साखळी ही 'मेक इन इंडिया' आणि स्वदेशी उद्योगांच्या क्षमतेची पावती आहे. महागड्या क्षेपणास्त्रांऐवजी अत्यंत किफायतशीर आणि अचूक पर्याय म्हणून ही तोफ रणांगणावर आपली छाप पाडत आहे. सीमांवर वाढता तणाव आणि बदलत्या जागतिक परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर अशा स्वदेशी आणि अद्ययावत तोफा सैन्यात समाविष्ट होणे ही काळाची गरज होती. देशाच्या सीमा सुरक्षित ठेवण्यासाठी आणि शत्रूच्या गोटात धडकी भरवण्यासाठी 'एटीएजीएस' ही तोफ भारताचे एक मजबूत आणि अजिंक्य ढाल-शस्त्र म्हणून सिद्ध होईल, यात शंका नाही.

## मुंबईत मुसळधार पावसाचा कहर; कुर्ल्यात भूस्खलन, 6 जणांचा मृत्यू

**मुंबई,12 ऑगस्ट :** मुंबईत सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे बुधवारी पहाटे कुर्ला परिसरात मोठी दुर्घटना घडली. कुर्ला पश्चिमेतील अशोकनगर आणि चिराग नगर परिसरात भूस्खलन होऊन अनेक घरांवर माती आणि मलबा कोसळला. या दुर्घटनेत आतापर्यंत 6 जणांचा मृत्यू झाल्याची माहिती आहे. मलब्याखाली आणखी काही जण अडकले असण्याची शक्यता असून बचावकार्य युद्धपातळीवर सुरू आहे. ही घटना बुधवारी पहाटे सुमारे 3 ते 3.48 वाजण्याच्या दरम्यान घडली. कुर्ल्यातील राठोड मेडिकलजवळील चिराग नगर येथील गौसिया चाळ तसेच घाटकोपर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील अशोकनगर परिसरात भूस्खलन झाले. रात्रीच्या अंधारात आणि मुसळधार पावसात अचानक मलबा कोसळल्याने अनेक घरांना त्याचा फटका बसला.

### जाहिर प्रगटन

उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड

जा.क्र. 2025/मशाका/जमाबंदी-१/ जन्म-मृत्यु नोंद/सिआर-89 दिनांक 10-07-2026

अर्जदार ०:- महादू सांडू डहाके रा. पिशोर ता. कन्नड जि.छ. संभाजीनगर

विरूध्द

गैरअर्जदार ०:- ग्रामपंचायत कार्यालय पिशोर ता. कन्नड जि. छ.संभाजीनगर

विषय :- जन्म-मृत्यु अधिनियम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज.

उपरोक्त विषयी अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ / ॲड. मार्फत / स्वतः अर्ज सादर करून अर्जदार यांच्या मुलगीचे जन्म प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार यांचा मुलगी मानसी महादू डहाके चा जन्म दिनांक 28-12-2007 रोजी पिशोर ता. कन्नड येथे झालेला आहे.

अर्जदार यांच्या मुलगी चा जन्म दिनांक 28-12-2007 रोजी पिशोर ता. कन्नड / ता. कन्नड येथे झालेला आहे. अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय कामासाठी जन्म/मृत्यू प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे तसा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

सदर जाहिर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस सुचीत करण्यात येते की, अर्जदार यांचा मुलगी मानसी महादू डहाके यांचा जन्म दिनांक 28-12-2007 रोजी पिशोर ता. कन्नड येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणास काही उजर/आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत म्हणजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक 19-08-2026 रोजी मा. न्यायालयात लेखी स्वरूपात आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणचाही आक्षेप/उजर न आल्यास अर्जदारास दिनांक 28-12-2007 रोजी पिशोर ता. कन्नड येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीतनंतर आलेला उजर/आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही.

करिता दिनांक ......./07/2026 रोजी सदर जाहिर प्रगटन माझ्या सहीनिशी व मा. न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

उपविभागीय अधिकारी कन्नड करिता

### जाहिर प्रगटन

उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड

जा.क्र. 2025/मशाका/जमाबंदी- १/ जन्म-मृत्यु नोंद/मिजार-88 दिनांक 10-07-2026

अर्जदार ०:- महादू सांडू डहाके रा. पिशोर ता. कन्नड जि.छ. संभाजीनगर

विरूध्द

गैरअर्जदार ०:- ग्रामपंचायत कार्यालय पिशोर ता. कब्रड जि. छ. संभाजीनगर

विषय :-जन्म-मृत्यु अधिनियम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज.

उपरोक्त विषयी अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ / ॲड. मार्फत / स्वतः अर्ज सादर करून अर्जदार यांच्या मुलगाचे जन्म प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार यांचा मुलगा अलोक महादू डहाके चा जन्म दिनांक 13-05-2005 रोजी पिशोर ता. कन्नड येथे झालेला आहे.

अर्जदार यांच्या मुलगा चा जन्म दिनांक 13-05-2005 रोजी पिशोर ता. कन्नड / ता. कन्नड येथे झालेला आहे. अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय कामासाठी जन्म/मृत्यू प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे तसा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

सदर जाहिर प्रगटनाब्दारे तमाम जनतेस सुचीत करण्यात येते की, अर्जदार यांचा मुलगा अलोक महादू डहाके यांचा जन्म दिनांक 13-05-2005 रोजी पिशोर ता. कन्नड येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणास काही उजर/आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत म्हणजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक 19-08-2026 रोजी मा. न्यायालयात लेखी स्वरूपात आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणचाही आक्षेप/उजर न आल्यास अर्जदारास दिनांक 13-05-2005 रोजी पिशोर ता. कन्नड येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीतनंतर आलेला उजर/आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही.

करिता दिनांक ....../07/2026 रोजी सदर जाहिर प्रगटन माझ्या सहीनिशी व मा. न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

उपविभागीय अधिकारी कन्नड करिता

# उसावरील पायरीला (पाकोळी) किडीचा वाढता प्रादुर्भाव : वेळीच करा एकात्मिक व्यवस्थापन; वनामकृविच्या तज्ज्ञांचे शेतकऱ्यांना आवाहन

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी







**परभणी :**-सध्याच्या पावसाळी हंगामात ढगाळ वातावरण, वारंवार होणारा रिमझिम पाऊस आणि वाढलेली आर्द्रता यामुळे काही भागातील उसामध्ये पायरीला (पाकोळी) या रसशोषक किडीचा प्रादुर्भाव वाढताना दिसून येत आहे. या किडीची पिल्ले व प्रौढ उसाच्या पानातील रस शोषून घेत असल्याने पानांची हिरवेपणा कमी होऊन पाने पिवळसर व निस्तेज होतात. त्याचबरोबर किडीच्या शरीरातून बाहेर पडणाऱ्या चिकट गोड पदार्थावर काळ्या बुरशीची वाढ होऊन पानांची अन्ननिर्मितीची प्रक्रिया मंदावते. पायरीला किडीचे वेळीच व्यवस्थापन न केल्यास उसाच्या उत्पादनात ३१ टक्के पर्यंत, तर साखर उताऱ्यामध्ये २ ते ३ टक्के पर्यंत घट येऊ शकते. त्यामुळे शेतकऱ्यांनी पिकाचे नियमित निरीक्षण करून किडीचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसानीच्या पातळीपर्यंत पोहोचण्यापूर्वीच योग्य एकात्मिक व्यवस्थापनाच्या उपाययोजना कराव्यात असे आवाहन वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी येथील कृषी तंत्रज्ञान माहिती केंद्राचे डॉ. दिगंबर पटाईत, डॉ. गजानन गडदे आणि श्री. मधुकर मांडगे या तज्ज्ञांनी शेतकऱ्यांना केले आहे.

किडीची ओळख आणि जीवनक्रम –

या किडीची मादी दिवसाच्या वेळी शक्यतो सावलीमध्ये आणि आडोशाला पानांच्या खालच्या बाजूला शिरेजवळ ४-५ ओळीत पुंजक्यामध्ये पांढरट ते हिरवट पिवळ्या रंगाची अंडी घालते, एका पुंजक्यामध्ये ३० ते ४० अंडी असतात. अंड्यावर मेणचट दोऱ्यासारखे आवरण असते. अंडी अवस्था तापमान व ऋतुमानानुसार बदलते. उष्ण हंगामात अंडी अवस्था साधारणतः ७ ते १२ दिवसांची, तर थंड व प्रतिकूल परिस्थितीत २० ते ४१ दिवसांपर्यंत असू शकते. हिवाळ्यामध्ये प्रतिकूल परिस्थितीत थंडीपासून अंड्याचे संरक्षण व्हावे यासाठी पानाच्या आतल्या आवरणामध्ये अंडी घातली जातात. अशा अंड्यातून पांढरट रंगाची पिल्लं बाहेर पडतात ज्यांच्या पृष्ठभागावर शरीरापेक्षा जास्त लांबीचे तंतुमय अवयव असतात आणि शरीरावर मेणचट आवरण असते. पिल्लावस्थेचा कालावधी देखील तापमान व ऋतुमानानुसार मोठ्या प्रमाणात बदलतो. तर प्रौढ फिकट पिवळसर रंगाची व पाचरीच्या आकाराची असतात. पायरीला किडींचे प्रौढ वातावरणानुसार १४ ते २०० दिवसांपर्यंत जिवंत राहू शकतात तसेच नरापेक्षा मादी काही काळ जास्त जिवंत राहते. अशाप्रकारे कीड एका वर्षात ३ ते ४ पिढ्या पूर्ण करते.

हवामानाचा प्रभाव

ही कीड वर्षभर सक्रिय असते; परंतु पायरीला किडीच्या वाढीसाठी उबदार व दमट वातावरण पोषक ठरते. पावसाळ्यातील ढगाळ वातावरण, वारंवार होणारा रिमझिम पाऊस आणि वाढलेली आर्द्रता यामुळे या किडीची संख्या वाढण्यास पोषक परिस्थिती निर्माण होऊ शकते. विशेषतः जुलै ते सप्टेंबर या कालावधीत किडीचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता असल्याने या काळात उसाचे नियमित निरीक्षण करावे. अतिउष्ण व कोरड्या वातावरणात किडीची संख्या कमी होते.

नुकसानीचा प्रकार व प्रादुर्भावाची लक्षणे

या किडीची पिल्ले आणि प्रौढ दोन्ही उसाच्या पानातील रस शोषण करतात,परंतु पिल्लं जास्त प्रमाणात नुकसान करतात. पानातील रस शोषण केल्याने उसाच्या पानाचा हिरवेपणा कमी होऊन पाने निस्तेज व पिवळी पडतात, तसेच हि किड पानावर एक प्रकारचा चिकट व गोड पदार्थ तिच्या शरीरातून बाहेर सोडते त्यामुळे पानावर काळ्या बुरशीचा प्रादुर्भाव होऊन काजळी पडल्यासारखा रंग चढून पानांची अन्न तयार करण्याची प्रक्रिया मंदावते आणि उसाची पाने वाळू लागतात आणि ऊसातील साखरेचे प्रमाण घटते. अशा उसापासून तयार केलेली साखर आणि गूळ कमी दर्जाचा मिळतो. वाढीच्या अवस्थेत जास्त प्रादुर्भाव दिसून आल्यास उसाच्या उत्पादनात घट होते तर पिकाच्या शेवटच्या अवस्थेत प्रादुर्भाव दिसून आल्यास साखर उताऱ्यात घट होते.

पर्यायी खाद्य वनस्पती

गहू, मका, ज्वारी, बाजरी, ओट, बार्ली, इतर तृणधान्ये आणि गवतवर्गिय तणे

निरीक्षण व आर्थिक नुकसानीची पातळी

पिकाचे नियमितपणे किमान आठवड्यातून एकदा निरीक्षण करावे. शेतातील विविध भागांतून उसाची बेटे/कांडे निवडून त्यावरील पानांवर पायरीला किडीची पिल्ले, प्रौढ व अंडीपुंज यांची नोंद घ्यावी. सरासरी ३ ते ५ पिल्ले किंवा प्रौढ प्रति पान अथवा १ अंडीपुंज प्रति पान आढळल्यास व्यवस्थापनाच्या उपाययोजना सुरू कराव्यात. निरीक्षण करताना शेताच्या बांधालगतचा भाग तसेच पिकाच्या आतील भागातील झाडे यांचा समावेश करावा.

एकात्मिक व्यवस्थापन

पिकाची फेरपालट करावी.

ज्याठिकाणी पायरीला किडीचा प्रादुर्भाव जास्त दिसून आला असेल त्या ठिकाणी खोडवा ऊस घेण्याचे टाळावे कारण खोडवा पीक किडीसाठी सतत उपलब्ध खाद्य वनस्पती म्हणून काम करू शकते आणि पायरीला किडीची संख्या वाढण्यास मदत होऊ शकते.

उसाची लागवड पट्टा अथवा रुंद सरी पद्धतीने करावी त्यामुळे कीडनाशकांची फवारणी किंवा धुरळणी करणे सोयीचे होईल.

लागवड करताना बेण्यास क्लोरोपारीफॉस २०% या कीटकनाशकाची ०२ मिली प्रति लिटर पाणी या प्रमाणात बेणे प्रक्रिया करून मगच लागवड करावी.

आंतरपीक म्हणून बटाटे,कांदा, टरबूज, काकडी, सोयाबीन, चवळी, भुईमूग यासारख्या पिकांची लागवड करावी.

पीक तन विरहित ठेवावे आणि पर्याय खाद्य वनस्पती नष्ट कराव्यात.

उसात पाणी साचत असल्यास चर काढून पाण्याचा निचरा करावा आणि पाण्याचा जास्त ताण पडल्यास पाणी द्यावे.

नत्रयुक्त खतांचा जास्त वापर करू नये. नत्राचा अतिरेक टाळून माती परीक्षण व पिकाच्या गरजेनुसार संतुलित खत व्यवस्थापन करावे. जास्त नत्रामुळे कोवळी व रसाळ वाढ वाढू शकते आणि रसशोषक किडींच्या वाढीस अनुकूल परिस्थिती निर्माण होऊ शकते.

खोडवा उसामध्ये खालची दोन पाने काढून टाकावी कारण किडीद्वारे अंडी देण्यासाठी या पानांना प्राधान्य दिले जाते.

जुनी वाळलेली पाने वेळोवेळी जमा करून नष्ट करावीत जेणेकरून पुढे होणारा प्रादुर्भाव कमी करता येईल.

पानावर अंडी पुंज आढळून आल्यास अशी पाने अंडी पुंजासह जमा करून नष्ट करावीत.

निरिक्षणासाठी व मोठ्या प्रमाणात प्रौढ जमा करून नष्ट करण्यासाठी एक प्रकाश सापळा प्रति पाच एकर क्षेत्र या प्रमाणात पिकाच्या उंचीच्या अर्धा फूट उंचीवर लावून सायंकाळी ६ ते रात्री १० या वेळेत चालू ठेवावा.

वनस्पतीजन्य कीटकनाशकामध्ये ५ टक्के निंबोळी अर्काची फवारणी करावी.

मेटारायझियम ॲनिसोप्ली या जैविक बुरशीचा वापर ४० ग्रॅम/१० लिटर पाणी या प्रमाणात करावा. तसेच या जैविक बुरशीच्या उत्पादनाची गुणवत्ता, जिवंत बीजाणूंची संख्या आणि उत्पादनाच्या प्रकारानुसार ही मात्रा बदलू शकते. त्यामुळे उपलब्ध नोंदणीकृत उत्पादनाचा वापर त्यावरील शिफारशीनुसार करावा.

इपिरिकॅनिया मेलॅनोल्युका या परोपजीवी मित्र कीटकांचे व इतर मित्र कीटकांचे संवर्धन करावे जेणेकरून नैसर्गिकरित्या किडींचे व्यवस्थापन होईल त्याकरीता रासायनिक कीटकनाशकाची फवारणी शक्यतो टाळावी. पायरीला किडीच्या शेतामध्ये इपिरिकॅनिया मेलॅनोल्युका चे पांढरे कोष, ढालकिडे, भक्षक भुंगेरे, क्रायसोपा व इतर नैसर्गिक शत्रू मोठ्या प्रमाणात आढळत असल्यास त्यांचे संरक्षण करावे आणि अनावश्यक रासायनिक फवारणी टाळावी.

उपलब्ध झाल्यास इपिरिकॅनिया मेलॅनोल्युका या परोपजीवी मित्र कीटकांचे ४००० ते ५००० कोष अथवा ४ ते ५ लाख अंडी शेतामध्ये सोडावीत. पायरीला किडीची संख्या आर्थिक नुकसानीच्या पातळीपर्यंत पोहोचल्यास उपलब्धतेनुसार ही जैविक नियंत्रणाची उपाययोजना करावी. इपिरिकॅनिया मेलॅनोल्युका हा पायरीला किडीच्या पिल्ले व प्रौढांवर बाह्यपरजीवी म्हणून कार्य करतो.

ज्या उसामध्ये मित्र कीटकांची संख्या जास्त दिसून येत असेल त्या शेतातील पाचट जाळू नये.

रासायनिक व्यवस्थापनाकरिता क्लोरोपायरीफॉस २० टक्के ६०० मिली प्रति एकर फवारावे. जैविक, यांत्रिक व इतर एकात्मिक उपाययोजनांनंतरही पायरीला किडीची संख्या आर्थिक नुकसानीच्या पातळीपेक्षा जास्त राहिल्यासच रासायनिक कीटकनाशकाचा वापर करावा. फवारणीपूर्वी संबंधित उत्पादनाच्या अद्ययावत लेबलवरील पीक, किडीची शिफारस, मात्रा, पाणी प्रमाण व प्रतीक्षा कालावधी तपासूनच वापर करावा.

आवश्यकता वाटल्यास दहा दिवसानंतर दुसरी फवारणी करावी. कीटकनाशकाची फवारणी आलटून-पालटून करावी मात्र मित्रकीटकांची संख्या जास्त असल्यास अनावश्यक दुसरी फवारणी टाळावी. रासायनिक कीटकनाशकांचा वापर हा किडीची संख्या, आर्थिक नुकसानीची पातळी आणि शेतातील मित्रकीटकांची स्थिती विचारात घेऊनच करावा.

फवारणी करताना घ्यावयाची अत्यंत महत्त्वाची काळजी

वरील कीटकनाशकांसोबत इतर कोणतेही कीटकनाशक, बुरशीनाशक, विद्राव्य खते किंवा सूक्ष्म अन्नद्रव्ये मिसळू नयेत

एकाच कीटकनाशकाची सलग फवारणी करू नये.

फवारणीसाठी स्वच्छ पाणी व शिफारशीनुसार पाण्याचे प्रमाण वापरावे

कमी पाणी वापरल्यास फवारणीचे अपेक्षित परिणाम मिळत नाहीत.

फवारणी करताना मास्क, हातमोजे इ. संरक्षक साधनांचा वापर करावा.

अधिक माहितीसाठी वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठातील कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्राच्या दूरध्वनी क्रमांक ०२४५२-२२९००० किंवा व्हाट्सअप हेल्पलाईन क्रमांक ८३२९४३२०९७ यावर संपर्क करावा. (कार्यालयीन वेळेत सुट्टीचे दिवस सोडून)

# श्री साईबाबांच्या बदनामीकारक व्हिडीओ प्रकरणी दिल्ली उच्च न्यायालयाचे महत्त्वपूर्ण निर्देश

## सर्व समाजमाध्यमांवरील आक्षेपार्ह मजकूर हटवण्याबाबत 7 दिवसांत निर्णय घेण्याचे जी.ए.सी.ला आदेश

**शिर्डी (प्रतिनिधी) :** श्री साईबाबा आणि श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्या विरोधात यूट्यूबसह समाजमाध्यमांवर प्रसारित करण्यात येणाऱ्या बदनामीकारक व धार्मिक भावना दुखावणाऱ्या व्हिडीओंच्या प्रकरणी दिल्ली उच्च न्यायालयाने महत्त्वपूर्ण निर्देश दिले आहेत. संस्थानकडून दाखल करण्यात आलेल्या याचिकेवर सुनावणी करताना मा. न्यायमूर्ती डॉ. स्वराणा कांता शर्मा यांच्या खंडपीठाने ग्रीव्हन्स अपिलेट कमिटीला पुढील सात दिवसांत या प्रकरणी कारणासहित निर्णय घेऊन १९ ऑगस्ट पर्यंत अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

या निर्देशांमुळे आक्षेपार्ह व्हिडीओ व मजकूर समाजमाध्यमांवरून हटवण्याच्या संस्थानच्या मागणीवर सक्षम प्राधिकरणाकडून तातडीने निर्णय होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. श्री साईबाबांची प्रतिमा, श्री साईबाबा संस्थानची प्रतिष्ठा तसेच देश-विदेशातील कोट्यवधी साईभक्तांच्या श्रद्धा व धार्मिक भावनांचे संरक्षण करण्यासाठी संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रकरणी कायदेशीर पाठपुरावा करण्यात आला. यूट्यूबकडे जुलै २०२६ मध्ये वारंवार तक्रारी करूनही अपेक्षित कार्यवाही न झाल्यानंतर हे प्रकरण इलेक्ट्रॉनिक्स व माहिती तंत्रज्ञान मंत्रालय तसेच जी एस सी समोर मांडण्यात आले. त्यानंतर संस्थानने दिल्ली उच्च न्यायालयात दाद मागितली. सुनावणीदरम्यान न्यायालयाने भाविकांच्या धार्मिक श्रद्धा व भावना यांचे महत्त्व अधोरेखित केले असून, अशा प्रकारच्या आक्षेपार्ह सामग्रीमुळे भारतीय राज्यघटनेच्या कलम २५ अंतर्गत संरक्षित धार्मिक स्वातंत्र्याच्या अधिकारांशी संबंधित प्रश्न निर्माण होत असल्याचे निरीक्षण नोंदविले.

संस्थानच्या वतीने ज्येष्ठ वकील प्रमोद कुमार दुबे यांच्यासह सौरव अग्रवाल, रवी शर्मा, प्राची दुबे, रूपराज बॅनर्जी, सत्यम शर्मा, हर्ष खबर, आर्यन कुमार तिवारी, अनुषा सिन्हा, खुशी अरोरा आणि शंभू प्रसाद सिंग यांनी न्यायालयासमोर संस्थानची बाजू मांडली. केंद्र सरकारच्या वतीने अतिरिक्त सॉलिसिटर जनरल चेतन शर्मा आणि मुख्य वकील विजय जोशी उपस्थित होते.

श्री साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थानने या प्रकरणाचा सातत्याने आणि प्रभावीपणे कायदेशीर पाठपुरावा केला. श्री साईबाबांच्या पवित्र प्रतिमेचा अवमान होऊ नये आणि कोट्यवधी साईभक्तांच्या श्रद्धेचे संरक्षण व्हावे, या भूमिकेतून संस्थानने घेतलेल्या ठाम भूमिकेला या न्यायालयीन निर्देशांमुळे महत्त्वपूर्ण बळ मिळाले आहे.

या निर्देशांनंतर *श्री साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर म्हणाले -*

“साईभक्तांच्या धार्मिक भावना, श्रद्धा आणि श्रीसाईबाबांच्या पवित्र प्रतिमेचा सन्मान राखणे तसेच संस्थानच्या प्रतिष्ठेचे संरक्षण करणे ही आमची सर्वोच्च प्राथमिकता आहे. मा. दिल्ली उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशांचे आम्ही स्वागत करतो. जी ए सी कडून या प्रकरणी सात दिवसांत कारणासहित निर्णय अपेक्षित असून, आक्षेपार्ह व बदनामीकारक सामग्रीबाबत योग्य ती कार्यवाही होईल, असा आम्हाला विश्वास आहे..

# ग्रामपंचायतींनी घनकचरा व्यवस्थापनात पुढाकार घ्यावा: जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी.

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** आपल्या गावातील कचरा ही सर्वांची जबाबदारी असून, कचरा संकलित करून त्याचे योग्य व्यवस्थापन करण्यासाठी ग्रामपंचायतींनी पुढाकार घ्यावा आणि घनकचरा व्यवस्थापन नियमांची प्रभावीपणे अंमलबजावणी करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी विनय जी.सी. गौडा यांनी केले. पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ अंतर्गत अधिसूचित घन कचरा व्यवस्थापन नियमांची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. त्या अनुषंगाने जिल्हा परिषद पंचायत विभागाच्या वतीने शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या शेजारील भानुदास चव्हाण सभागृहात जिल्हास्तरीय प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रशिक्षणासाठी शहरालगतचे औद्योगिक क्षेत्र, ऐतिहासिक स्थळ आणि खाम नदीवरील ग्रामपंचायती अशा एकूण ५८ ग्रामपंचायतींचे सरपंच, ग्रामपंचायत अधिकारी व प्रशासक सहभागी झाले होते.

प्रशिक्षणाचे उद्घाटन जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांच्या हस्ते झाले. यावेळी व्यासपीठावर समाज कल्याण सभापती बालाजी सोनटक्के, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी.एम., सह आयुक्त नगर विकास सौरभ जोशी, मनपा उपायुक्त (घनकचरा) नंदकुमार भोबे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी पंचायत चंद्रहार ढोकणे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रकल्प संचालक जल जीवन मिशन डॉ. ओमप्रसाद रामावत आणि मुख्य लेखा व वित्त अधिकारी शिवप्रसाद जटाळे उपस्थित होते.

मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी गौडा म्हणाले की, घनकचरा व्यवस्थापन नियमांची अंमलबजावणी प्रभावीपणे व गांभीर्यपूर्वक होणे गरजेचे आहे, कारण याचा संबंध थेट ग्रामस्थांचे आरोग्य, गावाचे वातावरण आणि सार्वजनिक स्रोतांच्या संरक्षणाशी आहे. तसेच अंमलबजावणी, कारवाई व नियोजनासाठी सीएसआर (CSR) निधीचा वापर करावा, असेही त्यांनी नमूद केले. शहरालगतच्या ग्रामपंचायतींमध्ये वाढत्या शहरीकरणामुळे मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण होत असून, नियमितपणे कचरा संकलन करण्याची जबाबदारी ग्रामपंचायतीची आहे. त्यासाठी सरपंच, सदस्य व अधिकाऱ्यांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन समाज कल्याण सभापती बालाजी सोनटक्के यांनी केले.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी.एम. यांनी काही महत्त्वाच्या सूचना दिल्या. श्रावण महिन्यात वेरूळ घृष्णेश्वर मंदिर परिसराची नियमित साफसफाई करावी, ऐतिहासिक स्थळ असलेल्या ग्रामपंचायतींनी मुख्य रस्त्यावर कमानी उभाराव्यात आणि स्थळाची मोठ्या प्रमाणावर प्रचार-प्रसिद्धी करावी, असे त्यांनी सांगितले. तसेच ग्रामपंचायतीमध्ये दंड वसुलीसाठी माजी सैनिक किंवा खाजगी एजन्सीवर जबाबदारी सोपवावी आणि येत्या १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिनी जिल्ह्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये घनकचरा व्यवस्थापनाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी ग्रामसभेत विशेष विषय घ्यावा, असे त्यांनी मार्गदर्शनात स्पष्ट केले.

दुसऱ्या सत्रात मनपा उपायुक्त घनकचरा नंदकुमार भोबे आणि सहआयुक्त नगर विकास सौरभ जोशी यांनी घनकचऱ्याविषयी मार्गदर्शन केले. त्यानंतर प्रशिक्षणार्थींनी रमानगर स्मशानभूमी येथील घनकचरा संकलन केंद्राला भेट देऊन प्रत्यक्ष माहिती घेतली. या प्रशिक्षणात इको सत्वाच्या प्रियंका वझे, सहायक गट विकास अधिकारी साहेबराव चव्हाण, गट विकास अधिकारी शिवाजी साळुंके, विस्ताराधिकारी प्रकाश तुपे, राधाकृष्ण चौधरी, ग्रामसेवक संघटनेचे प्रवीण नलावडे यांच्यासह विविध ग्रामपंचायतींचे सरपंच आणि अधिकारी उपस्थित होते.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



# परभणी जिल्ह्यात महिला शेतकरी गटांना कृषी अवजारे बँक स्थापन करण्याची संधी

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी.

**परभणी,:** नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प टप्पा-२ अंतर्गत प्रकल्प गावांमध्ये 'गावस्तरावरील कृषी अवजारे बँक' स्थापन करण्यासाठी नोंदणीकृत महिला शेतकरी गटांना यंत्रसामग्री खरेदीची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र महिला गटांनी ३१ ऑगस्टपर्यंत ऑनलाइन अर्ज करावेत, असे आवाहन प्रकल्प संचालक (आत्मा) दौलत चव्हाण यांनी केले आहे.

'एक गाव, एक कृषी अवजारे बँक' या संकल्पनेनुसार तालुकानिहाय लक्षांक निश्चित करण्यात आला आहे. प्रकल्प गावातील एमएसआरएलएम (उमेद) व माविम पुरस्कृत महिला बचत गट तसेच महिला गाव संघ या घटकासाठी पात्र आहेत. एका गावातून एकापेक्षा अधिक गटांचे अर्ज प्राप्त झाल्यास निवड प्रक्रिया ऑनलाइन लॉटरी पद्धतीने केली जाणार आहे. यापूर्वी ऑनलाइन लॉटरीद्वारे ११ महिला गटांची निवड करण्यात आली आहे.

उर्वरित पात्र गावस्तरीय कृषी अवजारे बँक घटकासाठी एफपीओ-डीबीटी पोर्टलवर ऑनलाइन अर्ज दि.३१ ऑगस्टपर्यंत करता येणार आहेत. प्रकल्पाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार पूर्ण केलेल्या प्रकल्प किमतीच्या ६० टक्के अनुदान देय राहणार आहे.

या योजनेच्या माध्यमातून महिला शेतकरी केवळ शेतीपुरत्या मर्यादित न राहता शेतीपूरक व्यवसाय, यंत्रसामग्री व्यवस्थापन व सेवा क्षेत्रातही पुढे याव्यात, हा उद्देश आहे. कृषी अवजारे बँकेमुळे महिला गटांना उत्पन्नाचे नवीन साधन उपलब्ध होण्यासोबतच गावातील शेतकऱ्यांना आवश्यक यंत्रसामग्री वेळेवर भाडेतत्त्वावर उपलब्ध होणार आहे. या अंतर्गत लहान किंवा मोठा ट्रॅक्टर तसेच किमान तीन कृषी अवजारे घेता येणार असल्याचे श्री. चव्हाण यांनी सांगितले.

योजनेची अधिक माहिती व मार्गदर्शनासाठी संबंधित तालुक्यातील सहाय्यक कृषी अधिकारी किंवा तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## खाटू श्याम रेल्वे यात्रेला भक्तांचा उदंड प्रतिसाद; 61 टक्के महिला-ज्येष्ठांचा सहभाग

# आनंददायी आणि संस्मरणीय यात्रेची अनुभूती मिळेल - राध्येश्याम चांडक

हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी



**सोयगाव,दि.१२ ऑगस्ट :** खाटू श्यामजींच्या दर्शनाची आणि श्रीमद् भागवत कथेची अनुभूती घेता यावी, यासाठी सद्भावना सेवा समितीच्या वतीने ३० ऑगस्ट ते ५ सप्टेंबरदरम्यान आयोजित खाटू श्याम रेल्वे यात्रेला भक्तांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे. विशेष म्हणजे यात्रेतील तब्बल ६१ टक्के सहभागी महिला व ज्येष्ठ नागरिक आहेत.एकट्याने प्रवास करता येत नसल्याने धार्मिक यात्रा करण्याची इच्छा अपूर्ण राहणाऱ्या भक्तांसाठी समितीने सुरक्षित रेल्वे प्रवासासह निवास, भोजन आणि धार्मिक कार्यक्रमांची व्यवस्था केली आहे. भक्तांनी समितीवर दाखविलेला विश्वास ही आमच्यासाठी मोठी जबाबदारी आहे.प्रत्येक भक्ताला आनंददायी आणि संस्मरणीय यात्रा अनुभवता यावी, यासाठी समिती प्रयत्नशील आहे असे सद्भावना सेवा समितीचे अध्यक्ष राधेश्याम चांडक यांनी स्पष्ट केले आहे.

भक्तांना सकस आहार मिळावा आणि संपूर्ण प्रवासात चोख व्यवस्था राहावी,यावर समिती विशेष लक्ष देत आहे. चंपालाल शर्मा, राजेश देशलहरा, प्रा. प्रकाशचंद्र पाठक, तिलोकचंद चांडक, सुरेशचंद्र गट्टाणी, सिद्धार्थ शर्मा, उमेश मुंदडा, विजय व्यवहारे, सुभाष दर्डा, मधुकर गायकी, पुरणमल शर्मा, बबन परांजपे, लाला माधवाणी, मनमोहन शर्मा, रामनिवास यादव यांच्यासह अनेक कार्यकर्ते यात्रेच्या यशस्वी आयोजनासाठी परिश्रम घेत आहेत.

समितीचे अध्यक्ष राधेश्याम चांडक हे यात्रेच्या व्यवस्थेवर जातीने लक्ष ठेवून असून, कथा व यात्रा यशस्वी होण्यासाठी तन-मन-धनाने प्रयत्न करीत आहेत, अशी माहिती समितीचे सचिव प्रा. प्रकाशचंद्र पाठक यांनी दिली. त्यांनी खाटू श्यामजींकडे सर्व भक्तांच्या मनोकामना पूर्ण होण्यासाठी प्रार्थनाही व्यक्त केली.

- खाटूच्या भूमीत पाच दिवस भागवत कथा

खाटू श्यामजींच्या पावन भूमीत पाच दिवस श्रीमद् भागवत कथेचे आयोजन करण्यात आले आहे. कथेसाठी उभारण्यात आलेला मंडप खाटू श्यामजींच्या मंदिराच्या धर्तीवर आकर्षक पद्धतीने सजविण्यात आला आहे. यात्रेतील भक्तांच्या वाढत्या संख्येमुळे मंदिर परिसरातील तीन ठिकाणी निवासाची व्यवस्था करण्यात आली आहे. ३१ ऑगस्ट रोजी तीज व चतुर्थीनिमित्त विशेष धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. कथामंडपात महिलांच्या सहभागातून तीज पूजन व चतुर्थी पूजन होणार असून, खाटू श्यामजी मंदिरातील विशेष पंडित हे विधी पार पाडणार आहेत. यावेळी भक्तांसाठी फराळाचीही व्यवस्था करण्यात आली आहे.

- मंगल कलश यात्रा, सुंदरकांडही

३१ ऑगस्ट रोजी दुपारी बाल संत श्री. दीपशरणजी महाराज यांच्या उपस्थितीत मंगल कलश यात्रा काढण्यात येणार आहे. या कार्यक्रमाचे मुख्य यजमान सरला सुरेशचंद्र गट्टाणी आहेत. तसेच रायथल येथील प्रसिद्ध गायक व वाद्यवृंदाच्या सहभागातून सुंदरकांडाचे आयोजन करण्यात आले आहे.४ सप्टेंबर रोजी समितीच्या वतीने सालासर बालाजीचे दर्शन घडविण्यात येणार असून, त्यासाठी मिनी बसची व्यवस्था करण्यात आली आहे. यात्रेच्या प्रारंभी ३० ऑगस्ट रोजीचे भोजन भक्तांनी स्वतःसोबत आणायचे असून, त्यानंतरची भोजन व्यवस्था समितीच्या वतीने करण्यात येणार आहे.

- ३ हजार किमीचा प्रवास; पाच रुपयांपेक्षाही कमी दर

सुमारे ३ हजार किलोमीटरची ही रेल्वे यात्रा प्रति किलोमीटर पाच रुपयांपेक्षाही कमी खर्चात आयोजित करण्यात आली आहे. यात्रेची मधुर आठवण कायम राहावी, यासाठी समितीच्या वतीने प्रत्येक भक्ताला अल्पशी भेटही देण्यात येणार आहे.

# साई ट्रस्ट ज. ने. पोर्ट विद्यालयाचा कु. नमित प्रदीप वाघावले राष्ट्रीय ग्रामीण गुणवत्ता यादीत 10 वा

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी



**उरण /रायगड :** साई ट्रस्ट ज ने पोर्ट विद्यालय शेवा प्राथमिक विभाग इंग्रजी माध्यमाचा हुशार, मेहनती आणि गुणी विद्यार्थी कु. नमित प्रदीप वाघावले याने प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत २९८पैकी २४० गुण मिळवून रायगड जिल्हा राष्ट्रीय ग्रामीण गुणवत्ता यादीत १० वा आणि शाळेतून व उरण तालुक्यातून १ ला येण्याचा बहुमान पटकावला आहे. त्याला वर्ग शिक्षिका श्रीम. वंदना कपूर, श्रीम. सारिका तायडे, श्रीम. योगसाधना पाटील, श्रीम. सचिता वाघावले या मेहनती शिक्षिकांचे अमूल्य मार्गदर्शन लाभले. तसेच कु. नमित याचे पालक यांनी सुध्दा खूप मेहनत घेतली. कु. नमित वाघावले याने शाळेचे नाव संपूर्ण रायगड जिल्ह्यात उंचावले आहे. तसेच शाळेचे ७ हुशार व मेहनती विद्यार्थी उत्तीर्ण (पात्र )झाले आहेत.त्याच्या या

उज्वल यशाबद्दल साई ट्रस्ट चे अध्यक्ष नरसू पाटील ,शाळेचे मुख्याध्यापक रमाकांत गावंड, गिरीश पाटील,भुषण जाधव, अंकुश जोगळे, श्रीम. वैशाली बोरचटे, ज्येष्ठ कलाशिक्षक मिलिंद ठाकूर, श्रीम. सुमन पाटील, श्रीम. भारती कांबळे, पंडित गणेश बंडा, सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, पालक-शिक्षक संघ आणि पालक संघर्ष समिती पदाधिकारी आणि तमाम पालक वर्ग यांनी विशेष अभिनंदन केले आहे.त्याच्यावर सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## एक कार्यालय एक नंबर कायमस्वरूपी संपर्क

# परभणी जिल्हा पोलीस अधीक्षक पंकज कुमावत यांचा अभिनव उपक्रम

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी



परभणी सर्वसामान्यांची जीवन दाईनी म्हणजे पोलीस वाहिनी पोलीस प्रशासनाशी सर्वसामान्य नागरिकांना व त्यांच्या आलेल्या अडचणीत तक्रार करण्यासाठी जलद गतीने पोहोचवाव्यात तसेच पोलीस आणि नागरिक मधील संपर्क अधिक दळण व सातत्यपूर्ण राहावा म्हणून या उद्देशाने परभणी जिल्हा पोलीस दलाने एक महत्त्वपूर्ण व अभिनव उपक्रम सुरू करून पोलीस अधीक्षक श्री पंकज कुमावत यांच्या संकल्पनेतून जिल्ह्यातील प्रत्येक पोलीस ठाणे तसेच प्रमुख शाखांना स्वातंत्र्य कायमस्वरूपी शासकीय मोबाईल क्रमांक व सिम कार्ड उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

अनेक वेळा एखाद्या नागरिकाला तक्रार किंवा समस्या मांडण्यासाठी नेमका कोणत्या अधिकाऱ्याशी संपर्क साधावा व अधिकारी ची बदली झाली तिथे अधिकाऱ्यांशी कायमचा संबंध बंद होतो नागरिकांसोबत फार मोठे अडचणी अनेक समस्या निर्माण होतात याकरिता परभणी पोलिसांनी एक कार्यालय एक नंबर ही संकल्पना प्रत्यक्षात अमलात आणली आहे आता नागरिकांना संबंधित अधिकाऱ्याचा नव्हे तर संबंधित कार्यालयाचा अधिकृत नोंदणी क्रमांक लक्षात ठेवा लागणार आहे त्यामुळे प्रशासनातील सातत्याने कायम राखण्याबरोबरच नागरिकांच्या तक्रार योग्य ठिकाणी जलद गतीने पोहोचण्यात मदत होणार आहे. नव्या तंत्रज्ञानाच्या माध्यमातून पोलीस यंत्रणा आणि नागरिक यांच्यातील संवाद अधिक सुलभ सोयीचे करण्या साठी उपक्रम महत्त्वाचा मानला जात आहे तक्रार अर्ज माहिती किंवा अडचण यासाठी नागरिकांना संबंधित कार्यालयाचे थेट संपर्क साधता येणार असल्याचे यावेळी वेळेची बचत सोबतच तक्रारी योग्य यंत्रणाकडे पोहोचण्यास प्रक्रिया अधिक सुलभ होणार आहे यामध्ये विशेष म्हणजे ग्रामीण भागातील नागरिकांसाठी हा उपक्रम उपयुक्त ठरणार असून स्थानिक पातळीवरील पोलीस ठाणे उपयोगी कार्यालय आणि विविध शाकांशी थेट संपर्काची सुविधा उपलब्ध होणार असून संपर्कासाठी खालील नंबर देण्यात आले आहे

# जपतलई आश्रमशाळा प्रकरणी मुख्याध्यापकांसह तिघांविरुद्ध गुन्हा

## शाळा बंद करण्याची शिफारस

गडचिरोली, १२ ऑगस्ट : धानोरा तालुक्यातील जपतलई येथील अनुदानित आश्रमशाळेत सर्पदंशामुळे तीन विद्यार्थिनींचा मृत्यू झाल्याच्या दुर्दैवी घटनेची जिल्हा प्रशासन आणि आदिवासी विकास विभागाने गंभीर दखल घेतली आहे. घटनेतील जबाबदारी निश्चित करण्यासाठी संबंधित संस्था, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांविरुद्ध प्रशासकीय तसेच कायदेशीर कारवाई सुरू करण्यात आली आहे. जपतलई येथील संबंधित अनुदानित आश्रमशाळा बंद करण्याची शिफारस शासनाकडे करण्यात आली असून, आश्रमशाळेचे मुख्याध्यापक आणि दोन्ही वसतिगृह अधीक्षकांविरुद्ध धानोरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच मागील एक वर्षात शाळेची तपासणी करणाऱ्या संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.

मुख्याध्यापकांसह तिघांविरुद्ध गुन्हा : या प्रकरणात एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, गडचिरोलीचे सहायक प्रकल्प अधिकारी (शिक्षण) डॉ. प्रभू पुन्या सादमवार यांच्या फिर्यादीवरून धानोरा पोलीस ठाण्यात अपराध क्रमांक ८६/२०२६ नोंदविण्यात आला आहे. पोलीस नोंदीनुसार, आश्रमशाळेचे मुख्याध्यापक प्रशांत विलासराव ताटपल्लीवार (५१), महिला वसतिगृह अधीक्षिका भाग्यश्री ज्ञानेश्वर चिंल्लमवार (३४) आणि वसतिगृह अधीक्षक भास्कर रामचंद्र भोयर (५०) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १० ऑगस्ट २०२६ रोजी रात्री सुमारे दोन वाजता ही घटना घडल्याचे पोलीस नोंदीत नमूद आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात 'अँटी रॅगिंग दिन' उत्साहात संपन्न; विद्यार्थ्यांनी घेतली रॅगिंगविरोधी शपथ

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी



**छत्रपती संभाजीनगर :** रॅगिंगमुक्त आणि सुरक्षित शैक्षणिक वातावरण तयार करण्याच्या उद्देशाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात 'अँटी रॅगिंग दिन' विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. या निमित्ताने विद्यापीठ परिसरातील ज्ञान स्रोत केंद्रासमोरील मैदानात आयोजित विशेष कार्यक्रमात शेकडो विद्यार्थ्यांना रॅगिंगविरोधी शपथ देण्यात आली.

बुधवारी (दि. १२) सकाळी आयोजित या शपथविधी सोहळ्यामध्ये विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. कैलास अंभुरे यांनी उपस्थित सर्व विद्यार्थी, प्राध्यापक व कर्मचाऱ्यांना रॅगिंगमुक्त परिसर राखण्याची शपथ दिली. याप्रसंगी विद्यापीठातील वरिष्ठ अधिकारी, प्राध्यापक आणि प्रशासकीय कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. ज्ञान स्रोत केंद्र संचालक डॉ. सुभाष चव्हाण, डॉ. हिमंतराव जाधव, चीफ रेक्टर डॉ. सुनील नरवडे, उपकुलसचिव डॉ. संजय कवडे, डॉ. संजय शिंदे, डॉ. विनय लोमटे, डॉ. सचिन भूसारी आणि डॉ. अश्विनी मोरे यांच्या प्रमुख उपस्थितीने हा कार्यक्रम पार पडला.

यावेळी मार्गदर्शन करताना विद्यापीठ प्रशासनाने स्पष्ट केले की, कॅम्पसमध्ये कोणत्याही प्रकारच्या रॅगिंगला थारा दिला जाणार नाही आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षेला नेहमीच प्राधान्य दिले जाईल. नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना भयमुक्त वातावरणात शिक्षण घेता यावे, यासाठी अशा जनजागृती मोहिमा व शपथविधी कार्यक्रम महत्त्वपूर्ण ठरतात, असे मत उपस्थितांनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी गौतम सोनवणे, हरिश्चंद्र साठे आणि गजानन पालकर यांनी विशेष परिश्रम घेतले. या कार्यक्रमाची छायाचित्रे आणि शपथेचा मसुदा सोबत जोडण्यात आला आहे.

# सोयगाव संत ज्ञानेश्वर महाविद्यालयीन विविध विकास पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात

हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी



**सोयगाव,दि.१२ ऑगस्ट :** संत ज्ञानेश्वर महाविद्यालयीन विविध विकास सहकारी पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली.सभेच्या अध्यक्षस्थानी पतसंस्थेचे चेअरमन डॉ.संतोष पडघन होते. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य शिरीष पवार व उपप्राचार्य आर.के.बारोटे व्यासपीठावर उपस्थित होते.

सभेच्या प्रारंभी आप्पासाहेब बाबुरावजी काळे यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. त्यानंतर सभेच्या विषयपत्रिकेचे वाचन तसेच वार्षिक अहवालाचे वाचन प्रा.अनिल मानकर यांनी केले.

या वेळी प्रा.डॉ.शत्रुघ्न भोरे यांचा विशेष सत्कार करण्यात आला.सभेत प्रा.व्ही. के.बारोटे,प्रा.शंतनू चव्हाण,प्रा. मगर, प्रा.भोरे,प्रा.कानडे,सचिव सुनील साळुंखे यांच्यासह अनेक सभासदांनी विविध विषयांवरील चर्चेत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.सभेचे अध्यक्ष डॉ.संतोष पडघन यांनी सभासदांना चालू आर्थिक वर्षासाठी ८ टक्के लाभांश देण्याची घोषणा केली.तसेच आर्थिक वर्षात सभासदांनी पतसंस्थेच्या कार्यात दिलेल्या सहकार्याबद्दल व संस्थेवर दाखविलेल्या विश्वासाबद्दल त्यांनी सर्व सभासदांचे आभार व्यक्त केले.यावेळी संस्थेच्या वार्षिक आर्थिक पत्रकांना तसेच नवीन पोटनियम नियमावली स्वीकारण्यास उपस्थित सभासदांनी सर्वानुमते मान्यता दिली. सभेचे कामकाज सुरळीत

# विजाभज, विमाप्र व इमाव विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती अर्ज भरावेत

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी.

**परभणी, :** इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास व विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी विविध मॅट्रिकपूर्व व मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनांचे ऑनलाईन अर्ज स्वीकारण्याची कार्यवाही महाडीबीटी २.० पोर्टलवर सुरू करण्यात आली आहेत.

पात्र विद्यार्थ्यांनी नवीन महाआयडी तयार करून आधार आधारित लॉगिनद्वारे अर्ज करावा. जात, उत्पन्न, अधिवास प्रमाणपत्र, शैक्षणिक गुणपत्रके आदी आवश्यक कागदपत्रे अपलोड करावीत. नवीन तसेच नूतनीकरण अर्जांसाठी नवीन महाआयडी आवश्यक आहे.

मॅट्रिकपूर्व स्तरावर सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती, गुणवत्तापूर्ण शिष्यवृत्ती, शिक्षण व परीक्षा शुल्क तसेच पीएम -यशस्वी योजनेचा, तर मॅट्रिकोत्तर स्तरावर राज्य शिष्यवृत्ती, शिक्षण व परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती, राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती आदी योजनांचा लाभ पात्र विद्यार्थ्यांना मिळणार आहे. शिष्यवृत्तीची रक्कम विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात थेट जमा होणार असल्याने अर्जातील माहिती अचूक भरण्याचे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी ०२२-४९१५०८०० / १८००१०२५३११ किंवा helpdesk@mahadbt.gov.in वर संपर्क साधावा, असे आवाहन इतर बहुजन कल्याण विभागाचे सहायक संचालक रामेश्वर मुंडे यांनी प्रसिद्धीपत्रकाव्दारे कळविले आहे.

# 'ढाई आखर' राष्ट्रीय पत्र लेखन स्पर्धेत सहभागी होण्याचे आवाहन

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी.

**परभणी:** भारतीय डाक विभागातर्फे राष्ट्रीय स्तरावर 'ढाई आखर' पत्र लेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. यावर्षी स्पर्धेचा विषय "अ लेटर टू माय मदर अर्थ - माय प्रामीस टू प्रोटेक्ट नेचर" अर्थात "माझ्या पृथ्वी-मातेला एक पत्र - निसर्गाचे रक्षण करण्याचे माझे वचन" असा आहे. या स्पर्धेत विद्यार्थी तसेच सर्व नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन परभणी विभागाचे डाक अधीक्षक संजय अंबेकर यांनी केले आहे.

ही पत्रलेखन स्पर्धा १८ वर्षांपर्यंत व १८ वर्षांपेक्षा जास्त अशा दोन वयोगटात घेण्यात येणार आहे. स्पर्धकांनी पत्रामध्ये आपले नाव, पत्ता तसेच वयाचा स्पष्ट उल्लेख करणे आवश्यक आहे. वयाची गणना २ सप्टेंबर २०२६ रोजी ग्राह्य धरली जाणार आहे.

स्पर्धकांनी पत्र मुख्य पोस्टमास्तर जनरल, मुंबई-४०० ००१ यांच्या नावे लिहून जवळच्या टपाल कार्यालयामार्फत पाठवावे. पत्र एफोर आकाराच्या कोऱ्या कागदावर लिहिणे आवश्यक असून, पाकिटातून पाठविण्यात येणाऱ्या पत्राची शब्दमर्यादा १ हजार शब्द आहे. अंतर्देशीय पत्राचा वापर केल्यास त्याची शब्दमर्यादा ५०० शब्द राहील.

पत्र पाठविण्याची अंतिम तारीख ३१ ऑगस्ट २०२६ आहे.

राज्यस्तरावर प्रत्येक वयोगटातून प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाच्या विजेत्यांना अनुक्रमे २५ हजार, २० हजार व १० हजार रुपये अशी रोख पारितोषिके देण्यात येणार आहेत. तसेच राष्ट्रीय स्तरावर निवड झालेल्या उत्कृष्ट पत्रांसाठी अनुक्रमे ५० हजार रुपये, २५ हजार रुपये व २० हजार रुपये अशी रोख पारितोषिके देण्यात येणार आहेत.

निसर्ग संवर्धनाचा संदेश प्रभावीपणे मांडण्याची संधी देणाऱ्या या राष्ट्रीय स्तरावरील 'ढाई आखर' पत्र लेखन स्पर्धेत विद्यार्थी, युवक तसेच सर्व नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा, असे आवाहन डाक अधीक्षक संजय अंबेकर यांनी केले आहे.

# नेहरू महाविद्यालयात भारतीय ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ.रंगनाथन यांची जयंती साजरी

हिंदू प्रकाशवार्ता/ प्रतिनिधी



सोयगाव,दि.१२ ऑगस्ट

अजिंठा शिक्षण संस्था संचलित पंडित जवाहरलाल नेहरू महाविद्यालयात आज ग्रंथालय विभागातर्फे वाचन संस्कृती यावर विशेष व्याख्यान ठेवण्यात आले. याप्रसंगी शिवछत्रपती महाविद्यालय पाचोड तालुका पैठण जिल्हा छत्रपती संभाजी नगरचे ग्रंथपाल डॉ.हरिप्रसाद बिडवे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.त्यांनी विद्यार्थ्यांना वाचन संस्कृती याविषयी मार्गदर्शन केले. त्यांनी असे सांगितले स्क्रीन टाईम च्या ऐवजी रीडिंग टाईम वाढवला पाहिजे असे याप्रसंगी त्यांनी मांडले.सरांनी वाचन संस्कृती आणि ए. आय.याची सांगड सरांनी योग्य पद्धतीने उदाहरणासहित मांडली. विद्यार्थ्यांनी अधिक अधिक वाचन केले पाहिजे आणि त्याची सुरुवात लगेच आजपासून आपल्या स्वतःपासून केली पाहिजे.त्यांनी त्यांच्या भाषणात भारतीय ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ.एस.आर.रंगनाथन यांचे ग्रंथालयशास्त्र संबंधित पाच नियम आणि या पाच नियमावर पूर्ण ग्रंथालय शास्त्र हे आजच्या एआय जनरेशन मध्ये सुद्धा टिकून आहे असे आवर्जून सांगितले.ग्रंथपालांनी या पाच नियमाचा उपयोग करून आपले ग्रंथालय समृद्ध आणि सुसज्ज केले पाहिजे असे त्यांनी नमूद केले.डॉ.एस. आर. रंगनाथन यांच्याविषयी त्यांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या वर्गीकरण पद्धत आणि त्याची संरक्षणा याबद्दल माहिती दिली. ग्रंथालय आणि माहितीशास्त्र हा विभाग महाविद्यालयाचा आत्मा असून त्यादृष्टीने त्यावर काम झाले पाहिजे. आजच्या युगात वाचन संस्कृती ही प्रतिकूल परिस्थितीमध्ये दिसत नाही. विद्यार्थी हे फक्त आपल्या अभ्यासापुरते किंवा परीक्षा पास होण्या इतपर्यंतच ग्रंथाचा वापर करतात. ग्रंथालयशास्त्र आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स या दोघांची सांगड घालून ग्रंथालयातील वाचक वर्ग हा वाढीवला पाहिजे. शेवटी डॉ.बिडवे सरांनी रोज एक घंटा वाचन आणि एक घंटा स्क्रीन टाइम असा टाईम टेबल करून तो अमलात पाहिजे आणला पाहिजे.अध्यक्ष समारोपात पंडित जवाहरलाल नेहरू महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पंडित नलावडे यांनी साधनाचा योग्य पद्धतीने वापर झाला पाहिजे मग ते आर्टिफिशियल इंटेलिजन्स असो किंवा इतर स्वरूपात. वाचनाने आपले पावित्र्य हे टिकून राहते,विद्यार्थ्यांनी स्वतःपासून बदल करून डिजिटल साधने याचा वापर कमी करून ग्रंथालयातील ग्रंथ हे जास्तीत जास्त वाचले पाहिजे.विद्यार्थी आता परीक्षा पुरता केंद्रित झालेला आहे या विद्यार्थ्यांना वाचन संस्कृतीचा उपयोग कसा होईल असेही त्यांनी त्यांच्या अध्यक्ष समारोपात सांगितला. कार्यक्रमाचे प्रस्ताविक व सूत्रसंचालन महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ.राजू तुपे यांनी केले. त्यांनी त्यांच्या प्रस्ताविक मध्ये डॉ.एस.आर.रंगनाथन यांच्या जीवनाचा प्रवास सांगितला. विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त ग्रंथ वापर करून आपल्या ज्ञानात भर पाडावा असेही त्यांनी आवर्जून सांगितले. कार्यक्रमाचे आभार वाणिज्य विभागाचे डॉ.किशोर लोखंडे यांनी केले .कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व वरिष्ठ प्राध्यापक,शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी,विद्यार्थी उपस्थित होते.राजू मोरे आणि भरत औरंगे यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतले.

# सोयगाव येथील संत ज्ञानेश्वर महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित्त एचआयव्ही जनजागृती

हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी




**सोयगाव,दि.१२ ऑगस्ट :** अजिंठा शिक्षण संस्था संचलित संत ज्ञानेश्वर महाविद्यालय, सोयगाव येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित्त ग्रामीण रुग्णालय सोयगाव येथे एचआयव्ही जनजागृती व मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

यावेळी विद्यार्थ्यांना एचआयव्ही संसर्गाची कारणे, प्रतिबंधात्मक उपाययोजना,संसर्ग टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी तसेच एचआयव्ही बाबत समाजात असलेले गैरसमज याविषयी सविस्तर मार्गदर्शन समुपदेशक सुनील वानखेडे व अतुल मुळे यांनी केले. युवकांनी एचआयव्हीविषयी योग्य माहिती जाणून घेऊन समाजात जनजागृती करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

ग्रामीण रुग्णालयातील एकात्मिक सल्ला व चाचणी केंद्र (ICTC) येथे एचआयव्हीबाबत समुपदेशन तसेच एचआयव्हीची तपासणी केली जाते,याची विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष माहिती देण्यात आली. केंद्राचे कार्य,समुपदेशनाची प्रक्रिया आणि तपासणीबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

विद्यार्थ्यांच्या विविध शंकांचे निरसन करून एचआयव्हीबाबत जनजागृतीचा सकारात्मक संदेश देण्यात आला.कार्यक्रमासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक ज्ञानेश्वर बावस्कर,भूषण वाकेकर,कन्हैया गवळी,नकुल जाधव,सोहम कतलकर यांच्यासह अनेक स्वयंसेवक उपस्थित होते.विद्यार्थ्यांनी कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवून एचआयव्हीविषयी जनजागृतीचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याचा संकल्प केला.

# "देश मेरा रंगीला" स्पर्धेत तरुणाईचा जल्लोष

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** युवामित्र फाउंडेशनच्या वतीने आयोजित १३व्या स्वाभिमानी सोहळ्यानिमित्त "देश मेरा रंगीला" आंतरशालेय व महाविद्यालयीन नृत्य व गीत गायन स्पर्धा संत एकनाथ रंगमंदिरात उत्साहात पार पडली. विविध शाळा-महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीतांवर नृत्य व गायन सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

स्पर्धेचे उद्घाटन माजी महापौर नंदकुमार घोडेले, गायक प्रमोद सरकटे, प्राचार्य सुनील वाकेकर व भारत कल्याणकर यांच्या उपस्थितीत झाले.



युवामित्र फाउंडेशनचे अध्यक्ष सचिन लिला सुखदेव अंभोरे यांनी मान्यवरांचे स्वागत केले. यावेळी कला, साहित्य, सांस्कृतिक, सामाजिक व उद्योग क्षेत्रात योगदान देणाऱ्या मान्यवरांचा कला सन्मान करण्यात आला.

## 'देवा श्री गणेशा' नृत्य महोत्सव

**आगामी गणेशोत्सवानिमित्त युवामित्र फाउंडेशन व लाईव्ह महाराष्ट्र मराठीच्या वतीने "देवा श्री गणेशा" राज्यस्तरीय नृत्य महोत्सव आयोजित करण्यात येणार आहे. महाराष्ट्राच्या लोकपरंपरा नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने होणाऱ्या या महोत्सवात कलावंतांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन सचिन अंभोरे यांनी केले.**

नंदकुमार घोडेले यांनी देशभक्ती व देशप्रेम रुजविणाऱ्या या उपक्रमाचे कौतुक केले. गायक प्रमोद सरकटे यांनी देशभक्तीपर गीत सादर केले. स्पर्धेतील विजेत्यांना स्मृतिचिन्ह व पारितोषिके, तर सर्व सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे देण्यात आली.

गीत गायनाचे परीक्षण मनोज पाटोळे, तर नृत्याचे परीक्षण अर्जुन टाक, निकेश म्हस्के व स्नेहा यांनी केले. सूत्रसंचालन सद्दाम शेख यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी युवामित्र फाउंडेशनच्या कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

# खुलताबाद श्रावणा निमित्त भद्रा मारुती मंदिर संस्थांच्या वतीने भाविकांसाठी सुख सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सज्ज

दैनिक हिंदू प्रकाश वार्ता

**खुलताबाद :** येत्या १३ ऑगस्टपासून श्रावण महिन्यास प्रारंभ होत असून, श्रावणातील प्रत्येक शनिवार तसेच इतर दिवशी श्री भद्रा मारुती मंदिरात दर्शनासाठी मोठ्या संख्येने भाविक दाखल होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर श्री भद्रा मारुती संस्थान व प्रशासनाच्या वतीने भाविकांच्या सुरक्षिततेसह विविध सोयी-सुविधांची जय्यत तयारी सुरू करण्यात आली आहे.

भाविकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने मंदिर परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले असून, कडेकोट सुरक्षा व्यवस्था उभारण्यात येत आहे. तसेच



दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना ऊन व पावसाचा त्रास होऊ नये, यासाठी मंदिर परिसरात भव्य शेड उभारण्याचे काम सुरू आहे.

श्रावणातील प्रत्येक शनिवारी भाविकांची मोठी गर्दी होत असल्याने दर्शन प्रक्रिया सुलभ व सुरळीत पार पडावी, तसेच भाविकांची कोणतीही गैरसोय होऊ नये, यासाठी विशेष नियोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्राच्या विविध भागांतून भाविक श्रावण महिन्यात श्री भद्रा मारुतीच्या दर्शनासाठी खुलताबाद येथे येतात. त्यामुळे गर्दीचे नियोजन, सुरक्षा, दर्शन व्यवस्था, पिण्याचे पाणी, निवारा यांसह आवश्यक सुविधांकडे विशेष लक्ष देण्यात येत आहे.

याबाबत श्री भद्रा मारुती संस्थानचे अध्यक्ष मिटू पाटील बारगळ मंत्री अतुल सावे मा खा चंद्रकांत खैरे व जनसंपर्क अधिकारी राजेंद्र जोंधळे हे संस्थांच्या वतीने सुख सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी नियोजन करत आहे

# कॅप फेरीतून नामांकित विधी महाविद्यालये गायब

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** विधी महाविद्यालयांमधील प्रवेशासाठी कॅप-१ फेरी सुरू झाली असतानाच मुंबईतील नामांकित गव्हर्नमेंट लॉ कॉलेज (जीएलसी) आणि के.सी. लॉ कॉलेज हे महाविद्यालये प्रवेशाच्या पर्यायांमध्ये उपलब्ध नसल्याने विद्यार्थ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. याप्रकरणी उच्च व तंत्रशिक्षण विभागाने तातडीने हस्तक्षेप करून विद्यार्थ्यांना स्पष्ट माहिती द्यावी, अशी मागणी युवामित्रांचे विद्यार्थी व युवा प्रतिनिधी निखिल काकडे यांनी उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्याकडे ई-मेलद्वारे केली आहे.

विधी शाखेत प्रवेश घेण्यासाठी इच्छुक असलेल्या अनेक विद्यार्थ्यांनी मुंबईतील गव्हर्नमेंट लॉ कॉलेज आणि के.सी. लॉ कॉलेजला पहिली पसंती दिली आहे. या महाविद्यालयांमध्ये प्रवेश मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात मेहनत घेतली असताना, सध्या सुरू असलेल्या कॅप-१ फेरीमध्ये या महाविद्यालयांचा पर्याय उपलब्ध नसल्याने विद्यार्थ्यांसमोर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

ही महाविद्यालये प्रवेश प्रक्रियेत का उपलब्ध नाहीत, त्यांचा कॅप फेरीतील सहभाग काय आहे आणि पुढील फेरीत त्यांचा समावेश होणार आहे का, याबाबत अधिकृत आणि सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना मिळत नसल्याने त्यांची चिंता वाढली आहे. त्यामुळे शासनाने तातडीने याबाबत स्पष्टता देऊन विद्यार्थ्यांचा संभ्रम दूर करावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

गव्हर्नमेंट लॉ कॉलेज, के.सी. लॉ कॉलेजसह इतर विधी महाविद्यालयांची कॅप फेरीतील सद्यस्थिती, पात्रता आणि सहभागाबाबतची अधिकृत माहिती संकेतस्थळावर उपलब्ध करून द्यावी. तसेच विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष वाया जाऊ नये, यासाठी आवश्यक विशेष उपाययोजना कराव्यात, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

# उपकेंद्र किनगाव येथे आरोग्य सेवांची पाहणी; पात्र नागरिकांची एनसीडी तपासणी करण्याच्या सूचना

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** 'माझं गाव, आरोग्य संपन्न गाव' अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीच्या अनुषंगाने प्राथमिक आरोग्य केंद्र गणोरी अंतर्गत उपकेंद्र किनगाव येथे राज्यस्तरीय पथकाने भेट देऊन आरोग्य सेवा आणि अभियानाच्या प्रगतीचा आढावा घेतला.

राज्य समन्वय अधिकारी, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई येथील रवींद्र देशमुख यांनी अभियानातील विविध निर्देशांकांचे बेसलाइन असेसमेंट करून त्याचे साप्ताहिक पर्यवेक्षण करण्याच्या सूचना दिल्या. उपकेंद्राच्या



कार्यक्षेत्रातील प्रत्येक पात्र नागरिकाची असंसर्गजन्य आजारांची (एनसीडी) तपासणी करावी. तसेच नियमितपणे आरोग्य संस्थेत न येणाऱ्या नागरिकांचा शोध घेऊन त्यांना तपासणी, उपचार आणि नियमित पाठपुराव्याशी जोडण्यावर भर देण्याचे निर्देश त्यांनी दिले.

समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. कल्पना साबळे यांनी संगणकीय सादरीकरणाद्वारे उपकेंद्राच्या कामकाजाची माहिती दिली. यावेळी अभियानांतर्गत घेण्यात आलेल्या बैठकांचे इतिवृत्त, निर्णय आणि त्यावरील कार्यवाहीची पाहणी करण्यात आली.

तंबाखूमुक्ती, आरोग्य जनजागृती, आशा स्वयंसेविकांच्या माध्यमातून प्रत्येक कुटुंबापर्यंत आरोग्यविषयक संदेश पोहोचविणे तसेच ६-एस तत्त्वांचा अवलंब करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

अभियानाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक आणि लोकप्रतिनिधींचा सक्रिय सहभाग आवश्यक असल्याचे पथकाने नमूद केले. ग्रामपंचायत, शाळा, अंगणवाडी तसेच सार्वजनिक ठिकाणी माहिती, शिक्षण व संवाद (आयईसी) साहित्याच्या माध्यमातून व्यापक जनजागृती करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या.

उपकेंद्र किनगावचे कामकाज समाधानकारक असल्याचे नमूद करताना आरोग्य सेवा अधिक गुणवत्तापूर्ण करण्यासाठी सातत्याने सुधारणा करण्याचे निर्देश राज्यस्तरीय पथकाने दिले.

यावेळी जिल्हास्तरीय पथकातील डॉ. सारिका लांडगे, विद्या सानप, लांघे, सचिन काशिद, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. गुरुनाथ इंदुरकर, समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. कल्पना साबळे यांच्यासह आरोग्य कर्मचारी, आशा स्वयंसेविका आणि गटप्रवर्तक उपस्थित होते.

# एमजीएममध्ये राष्ट्रीय ग्रंथपाल दिनानिमित्त भव्य ग्रंथ प्रदर्शन; 20 हजारांहून अधिक ग्रंथांचे प्रदर्शन

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** भारतीय ग्रंथालय व माहितीशास्त्राचे जनक पद्मश्री डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय ग्रंथपाल दिन साजरा करण्यात आला. या दिनाचे औचित्य साधून महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या विविध महाविद्यालयांमध्ये भव्य ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले.

जवाहरलाल नेहरू अभियांत्रिकी महाविद्यालय, डॉ.



जी.वाय. पाथ्रीकर संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय, इन्स्टिट्यूट ऑफ बायोसायन्स अँड टेक्नॉलॉजी आणि युनिव्हर्सिटी डिपार्टमेंट ऑफ फार्मास्युटिकल सायन्सेस येथे हे प्रदर्शन भरविण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे, ज्ञानसंपादनाला प्रोत्साहन देणे तसेच शैक्षणिक व संशोधनासाठी उपयुक्त साहित्याची माहिती करून देणे, हा या उपक्रमाचा उद्देश होता.

प्रदर्शनात विविध विषयांवरील २० हजारांहून अधिक ग्रंथ मांडण्यात आले. यात संदर्भग्रंथ, पाठ्यपुस्तके, साहित्यिक पुस्तके, तांत्रिक, व्यावसायिक आणि संशोधनविषयक साहित्याचा समावेश होता. प्रदर्शनाला विविध विभागांतील चार हजारांहून अधिक विद्यार्थ्यांनी भेट देत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

विद्यार्थ्यांनी विविध ग्रंथांची पाहणी करून आपल्या आवडीच्या विषयांतील पुस्तके आणि संदर्भ साहित्याची माहिती घेतली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृतीला चालना मिळण्यास तसेच ग्रंथालयातील साहित्याच्या वापराबाबत जागरूकता निर्माण होण्यास मदत झाली.

या वेळी अधिष्ठाता डॉ. प्राप्ती देशमुख, डॉ. जॉन चेलादुराई, प्राचार्या डॉ. विजया मुसांडे, डॉ. अर्चना पांचे, डॉ. संजय हरके, डॉ. हेमंत जैन, ग्रंथपाल सखाराम हरकळ, डॉ. रसिका वडाळकर यांच्यासह प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# तिरंगा सेल्फी काढून देशभक्तीचा उत्सव साजरा करा : आयुक्त अमोल येडगे

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** भारताच्या स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर 'हर घर तिरंगा अभियान २०२६' राबविण्यात येत असून, या अभियानात छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांनी मोठ्या संख्येने आणि उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे, असे आवाहन महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे यांनी केले आहे. या अभियानाच्या माध्यमातून नागरिकांमध्ये राष्ट्रध्वजाबद्दल आदर, अभिमान आणि देशभक्तीची भावना अधिक दृढ करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. नागरिकांनी आपल्या घरावर अभिमानाने तिरंगा फडकवावा तसेच आपल्या कुटुंबीयांसह तिरंग्यासोबत सेल्फी काढून ती अधिकृत संकेतस्थळावर अपलोड करावी, असे आवाहन आयुक्त अमोल येडगे यांनी केले आहे. हर घर तिरंगा अभियानाच्या अधिकृत संकेतस्थळावर नागरिकांना तिरंग्यासोबत काढलेली सेल्फी अपलोड करण्याची सुविधा उपलब्ध आहे. तसेच इच्छुक नागरिकांना या अभियानात स्वयंसेवक म्हणून नोंदणी करता येणार आहे.

तिरंग्यासोबत सेल्फी काढा आणि अभियानात सहभागी व्हा!

**https://harghartiranga.com/**

"प्रत्येक घरात तिरंगा आणि प्रत्येक मनात राष्ट्राभिमान" या भावनेतून नागरिकांनी या अभियानात सक्रिय सहभाग नोंदवून तिरंग्यासोबतची आपली सेल्फी मोठ्या संख्येने अपलोड करावी.

# PCL 2026 मध्ये डॅशिंग फोटोग्राफर संघ विजेता; सभापती अनिल मकरिये यांच्या हस्ते गौरव

## श्री साई इलेव्हन संघाला उपविजेतेपद; विजेत्या खेळाडूंचा बक्षीस वितरण सोहळ्यात सन्मान

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** फोटोग्राफर क्रिकेट लीग (PCL) 2026 च्या नवव्या पर्वाचा बक्षीस वितरण सोहळा उत्साहात पार पडला. महानगरपालिकेच्या स्थायी समितीचे सभापती अनिल मकरिये यांच्या हस्ते विजेत्या आणि उपविजेत्या संघांना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

यंदाच्या स्पर्धेत डॅशिंग फोटोग्राफर संघाने उत्कृष्ट कामगिरी करत विजेतेपद पटकावले, तर श्री साई इलेव्हन संघाने उपविजेतेपद मिळविले. विजेत्या आणि उपविजेत्या संघातील खेळाडूंचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.



फोटोग्राफर बांधवांमध्ये क्रिकेटच्या माध्यमातून उत्साह, एकोपा आणि मैत्रीचे वातावरण निर्माण करण्याच्या उद्देशाने PCL स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेत सहभागी संघांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मैदानावर उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. त्यामुळे संपूर्ण स्पर्धेत चुरशीचे आणि उत्साहपूर्ण वातावरण पाहायला मिळाले.

स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी विशाल मित्रे, सुनील गायकवाड, किरण तांबोळे, राहुल पवार, भूषण मुधलवाडकर, रमेश रावळे, नितीन शेजूळ आणि श्रीधर बक्षी यांनी विशेष परिश्रम घेतले.

PCL 2026 चे विजेतेपद पटकावणाऱ्या डॅशिंग फोटोग्राफर संघाचे तसेच उपविजेता श्री साई इलेव्हन संघाचे उपस्थित मान्यवर आणि फोटोग्राफर बांधवांनी अभिनंदन केले.

# श्रीक्षेत्र उपळा कालीमठ येथे नागपंचमीपासून अखंड हरिनाम सप्ताह

## सलग 50 वर्षांची परंपरा; सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त सप्ताहभर विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**कन्नड :** तालुक्यातील श्रीक्षेत्र उपळा कालीमठ येथे अखंड हरिनाम सप्ताह व श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहाची सलग ५० वर्षांची परंपरा असून, यंदा सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त सप्ताहभर विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. श्रावण शुद्ध पंचमी अर्थात नागपंचमी, सोमवार, १७ ऑगस्टपासून श्रावण शुद्ध द्वादशी, मंगळवार, २५ ऑगस्टपर्यंत हा धार्मिक सोहळा पार पडणार आहे.

सप्ताहादरम्यान दररोज पहाटे ४ ते सकाळी ६ वाजेपर्यंत काकडा आरती, सकाळी ६ ते ८ वाजता नगरप्रदक्षिणा, सकाळी ८ ते दुपारी १२ वाजेपर्यंत श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा, दुपारी १२ ते १ वाजेपर्यंत श्री संत तुकाराम महाराज गाथा भजन, सायंकाळी ६ ते ७ वाजता हरिपाठ, सायंकाळी ७ ते ८ वाजता महाप्रसाद, रात्री ९ ते ११ वाजता हरिकीर्तन आणि त्यानंतर भजनी मंडळाचा हरिजागर सोहळा होणार आहे.

सोमवार, १७ ऑगस्ट रोजी वेताळ महाराज मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा होणार आहे. त्यानंतर दररोज रात्री



९ ते ११ वाजता हभप पल्लवी महाराज खरजकर, हभप शीतल महाराज तुपे (नाशिक), हभप विठ्ठल महाराज घुगे (पंढरपूर), हभप भोजराज भोले बाबा, हभप तुकाराम महाराज गुजरंगे (लातूर), हभप शिवाजी महाराज तळेकर, हभप रामेश्वर महाराज तळेकर (नावडी) आणि हभप ज्ञानेश्वर महाराज राऊत (गणोरी) यांचे हरिकीर्तन होणार आहे.

मंगळवार, २५ ऑगस्ट रोजी सकाळी १० ते दुपारी १२ वाजेपर्यंत हभप जगन्नाथ महाराज देशमुख (पंढरपूर) यांचे काल्याचे कीर्तन होणार असून, त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

दरम्यान, शनिवार, २२ ऑगस्ट रोजी उपळा कालीमठ येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिराचा सहावा वर्धापन दिन सोहळा आयोजित करण्यात आला आहे. यानिमित्त सकाळी ८ ते १० वाजता विठ्ठल-रुक्मिणी यांचा महाअभिषेक व पूजा, सकाळी १० ते १२ वाजता हरिकीर्तन आणि त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

अखंड हरिनाम सप्ताहाचे हे ५० वे सुवर्ण महोत्सवी वर्ष असल्याने परिसरातील भाविकांनी या धार्मिक कार्यक्रमांसह भजन, कीर्तन व महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन भजनी मंडळ, समस्त ग्रामस्थ मंडळी आणि युवक मित्रमंडळ, उपळा कालीमठ यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# जनतेच्या प्रश्नांसाठी प्रशासनाच्या दारी; प्रलंबित कामे मार्गी लावण्यासाठी पाठपुरावा

हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

**सोयगाव,दि.१२ ऑगस्ट :** सर्वसामान्य नागरिकांच्या विविध समस्या जाणून घेत त्या प्रशासनाच्या माध्यमातून मार्गी लावण्यासाठी भाजपा अल्पसंख्यांक मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष तथा राज्यमंत्री दर्जा प्राप्त इद्रिस मुलतानी यांच्या उपस्थितीत तहसील कार्यालय सोयगाव तसेच पंचायत समिती कार्यालय सोयगाव येथे नागरिकांच्या विविध प्रश्नांवर चर्चा करण्यात आली.

यावेळी नागरिकांनी आपल्या विविध अडचणी व प्रलंबित कामांबाबत पदाधिकाऱ्यांकडे प्रश्न मांडले.संबंधित विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांशी चर्चा करून नागरिकांच्या प्रश्नांवर



योग्य तो मार्ग काढण्यासाठी आवश्यक पाठपुरावा करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

शासकीय कार्यालयांमध्ये येणाऱ्या सर्वसामान्य नागरिकांना त्यांच्या कामासाठी अनावश्यक त्रास होऊ नये,त्यांच्या समस्या वेळेत समजून घेऊन त्यावर योग्य कार्यवाही व्हावी तसेच शासनाच्या विविध योजना व सुविधांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचावा,यासाठी प्रशासन आणि नागरिक यांच्यातील समन्वय अधिक मजबूत करण्यावर यावेळी भर देण्यात आला.

जनतेच्या समस्या ऐकून घेणे,त्यासाठी प्रशासनाकडे पाठपुरावा करणे आणि विकासकामांना गती देणे,हीच जनसेवेची खरी भूमिका आहे,असे यावेळी पदाधिकाऱ्यांनी सांगितले.नागरिकांच्या प्रश्नांना प्राधान्य देऊन त्यांची कामे मार्गी लावण्यासाठी यापुढेही सातत्याने पाठपुरावा केला जाईल,अशी ग्वाही यावेळी देण्यात आली.

याप्रसंगी सोयगाव पंचायत समितीचे सभापती उत्तम चव्हाण,पंचायत समिती सदस्य राहुल राठोड,गजानन पवार यांच्यासह विविध पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# रोटरी इलाईट क्लबतर्फे शाळेला डिजिटल वर्गखोली, कंपोस्टिंग ड्रम

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** रोटरी क्लब ऑफ छत्रपती संभाजीनगर इलाईटतर्फे प्रतिभाताई पाटील हायस्कूल तथा वत्सलाबाई पाटील विद्यालयाला डिजिटल वर्गखोलीसाठी टीव्ही संच आणि सेंद्रिय खत निर्मितीसाठी दोन कंपोस्टिंग ड्रम प्रदान करण्यात आले. पी. पी. पटेल ट्रस्टच्या सामाजिक दायित्व निधीतून हा उपक्रम राबविण्यात आला.

डिजिटल वर्गखोलीमध्ये ४३ इंची टीव्हीसह इयत्ता पाचवी ते दहावीपर्यंतच्या सर्व विषयांचा संपूर्ण अभ्यासक्रम, मार्गदर्शन व परीक्षेची तयारी यांचा समावेश आहे. मराठी, इंग्रजी तसेच अर्ध-



इंग्रजी माध्यमातील विद्यार्थ्यांना याचा लाभ मिळणार आहे.

ज्ञानासोबतच विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण व्हावी, यासाठी कंपोस्टिंग ड्रम देण्यात आले. ओल्या कचऱ्यापासून सेंद्रिय खत निर्मितीचे प्रात्यक्षिक देऊन 'आपला कचरा, आपली जबाबदारी' हा संदेश विद्यार्थ्यांना देण्यात आला.

रोटरी क्लबच्या अध्यक्ष डॉ. माधुरी जोशी यांनी उपक्रमाची माहिती दिली. रो. स्वाती स्मार्त यांनी कंपोस्टिंगचे मार्गदर्शन केले. डॉ. अंजली भालचंद्र यांनी कंपोस्टिंगच्या माध्यमातून तीन-चार वर्षांत एक ट्रॅक्टरभर खत तयार केल्याचे उदाहरण दिले. यावेळी अशोक देवरे, सतीश जोशी, माधुरी सांगवीकर, प्रदीप जबदे, चंद्रकांत बहिवाल, सरोजिनी कदम आदी उपस्थित होते. मुख्याध्यापक शैलेंद्र पाटील, विलास बडक व ढमाले सर यांनी सहकार्य केले.

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911